रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १६१ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹


## गोवंडीत नवजात बालकाची विक्री

**मुंबई :** गोवंडीतील रॉयल हॉस्पिटल नावाने प्रसूती गृह आहे. या प्रसूती गृहात नुकत्याच जन्मलेल्या एका नवजात बालकाची विक्री होणार असल्याची माहिती शिवाजीनगर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ खात्री करून घेतल्यानंतर शनिवारी सायंकाळी रुग्णालयात छापा टाकला. पोलिसांना तेथे एक नवजात बालक मिळाले. ते नवजात बालक नवी मुंबई परिसरात राहणाऱ्या एका अविवाहित तरुणीचे असल्याचे कळले. या बालकाची काही दिवसांतच ५ लाख रूपयांना विक्री करणार होती. पोलिसांनी हे रुग्णालय चालवणाऱ्या डॉ.कय्यामउद्दीन खान यासह रुग्णालयात काम करणाऱ्या तसेच बाळाची विक्री करण्यासाठी आलेल्या दोन महिला अशा एकूण पाच जणांना अटक केली आहे.

## बहिणींच्या ई-केवायसीसाठी मुदतवाढ

**मुंबई :** राज्यात आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, अखेर अपेक्षेप्रमाणे महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने संदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. आता लाडकी बहीण योजनेच्या लाभ घेणाऱ्या महिलांना त्यांच्या ई-केवायसीसाठी मुदतवाढ जाहीर करण्यात आली आहे. सरकारने आता लाडक्या बहिणींना त्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत जाहीर केली आहे. खरंतर ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली नाही, त्यांची नावे योजनेच्या लाभार्थी यादीतून वगळली जाणार होती. शिवाय, ई-केवायसीची मुदतीचा १८ नोव्हेंबर हा शेवटचा दिवस होता.




### आजपासून मांडवा-अलिबाग मार्गावर

# अवजड वाहनांना बंदी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मांडवा जेट्टी ते अलिबाग मार्गावर अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबतची वाहतूक अधिसूचना सोमवारी (दि.१७) जारी केली आहे. या मार्गावर दररोज सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत जड-अवजड वाहनांकरिता वाहतूकबंदी करण्यात आली असून, पुढील आदेशापर्यंत ही बंदी कायम राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

रायगड जिल्हा हा पर्यटक जिल्हा असल्याने अलिबाग, मांडवा, किहीम, आक्षी, नागाव येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक आपापली वाहने घेऊन येत असतात. त्यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यातच मांडवा जेट्टी येथे जलप्रवासी वाहतूक बोटी तसेच रो-रो सेवा सुरु असल्याने त्यामधूनदेखील मुंबई येथून पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वाहने येत असतात. मांडवा जेट्टी ते अलिबाग हा मार्ग अरूंद असल्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊन नेहमीच अपघात होत असतात. तसेच, दर शनिवार-रविवार व सार्वजनिक सुट्टीला मुंबई येथून पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, विद्यार्थी तसेच पर्यटकांना प्रवासाकरिता जास्तीचा पान २ वर

### जिल्हाधिकारी किशन जावळेंकडून आदेश


(संग्रहीत छायाचित्र)

### या वाहनांना मुभा

जड-अवजड (ट्रक, कंटेनर, डंपर इ.) वाहनांना बंदी असेल. तर दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने तसेच पोलीस, फायर ब्रिगेड आणि रुग्णवाहिका यांना या कालावधीत मुभा असेल.

### बंदी कालावधी किती?

हा आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला असून, पुढील आदेश येईपर्यंत तो लागू राहील. स्थानिक नागरिक व पर्यटकांना यामुळे सुरक्षित, सोयीस्कर व अडथळाविरहित प्रवासाचा अनुभव मिळेल, असा विश्वास जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी व्यक्त केला.

### असे असेल वेळापत्रक

मांडवा जेट्टी ते अलिबाग या मार्गावर दररोज सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत जड-अवजड वाहनांना बंदी करण्यात आली आहे.

# सौदी अरबमध्ये मोठा अपघात




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सौदी अरबमध्ये मक्क्याहून मदिन्याला जाणाऱ्या एका बसचा भीषण अपघात झाला. बस व डिझेल टँकरच्या धडकेत तब्बल ४२ भारतीय हज यात्रेकरुंचा होरपळून मृत्यू झाला. मृत भारतीय प्रवाशांपैकी अनेकजण तेलंगणामधील हैदराबाद शहरातील रहिवासी होते.

भारतीय वेळेनुसार, रात्री १.३० वाजता सौदी अरेबीयातील मुफ्रीहाट स्थानकाजवळ हा अपघात झाला आहे. बस व डिझेल टँकरच्या धडकेमुळे टँकरमधील डिझेल पेटले आणि त्यातून झालेल्या स्फोटात बसमधील यात्रेकरू व चालक होरपळून निघाले. हा अपघात इतका भीषण होता की, अनेक प्रवाशांचा जागीच होरपळून मृत्यू झाला आहे. या अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर जवळच्याच रुग्णालयात उपचार चालू आहेत. मात्र, जखमींपैकी अनेकजण मोठ्या प्रमाणात होरपळले असून, त्यांना वाचवण्यासाठी डॉक्टरांचे शर्थीचे प्रयत्न चालू आहेत. या अपघातानंतर स्थानिक प्रशासन व आपत्कालीन मदत पथकं ताबडतोब घटनास्थळी दाखल झाली आणि त्यांनी बचावकार्य चालू केले. दरम्यान, तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी या घटनेची माहिती घेऊन राज्याचे मुख्य सचिव के. रामकृष्ण राव व पोलीस महासंचालक बी. शिवाधर रेड्डी यांना तातडीने या घटनेची सविस्तर माहिती गोळा करण्याचे निर्देश दिले आहेत.

तेलंगणा सरकार हे परराष्ट्र मंत्रालय व सौदी अरबमधील भारतीय दूतावासाबरोबर मिळून पीडित कुटुंबांची मदत करण्याचा प्रयत्न करत आहे. दरम्यान, भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी या दुर्घटनेनंतर सहवेदना व्यक्त केल्या आहेत. रियाधमधील भारतीय दूतावास आणि जेद्दाहमधील वाणिज्य दूतावास पीडित कुटुंबांना आणि जखमींना सर्वतोपरी मदत करत आहेत. जखमी यात्रेकरू लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना करत असल्याचे जयशंकर म्हणाले.

## वेधक

### फ्रान्सच्या तरुणीची मुंबईत छेडछाड

**मुंबई :** मुंबईतील खार परिसरात एका फ्रान्सच्या तरुणीचा रात्रीच्या सुमारास एकटे पाहून तरुणाने तिचा गैरफायदा घेतल्याची घटना घडली. पीडित फ्रेंच तरुणी महिनाभरापूर्वी भारतात आली असून, ती शिक्षिका म्हणून काम करते. ७-८ नोव्हेंबरच्या रात्री घरी चालत जात असताना आरोपीने तिला एकटी पाहून मोटारसायकलवरून तिच्याजवळ आला. त्यानंतर तिला अयोग्यरित्या स्पर्श केला. मात्र, तरुणीने मदतीसाठी ओरड केली असता आरोपीने घटनास्थळावरून पळ काढला. सुनील विष्णू वाघेला (२५) असे आरोपीचे नाव असून, पोलिसांनी त्याला धारावी येथील राहत्या घरातून अटक केली.

### तृतीय पंथियांकडून तरुणावर अत्याचार

**मुंबई :** भास्कर औरक्या स्वामी शेट्टी, कावेरी वेलमुर्गन वेदमा निकम, नाझिया गौस शेख ऊर्फ नवाज आणि माही तबरेज खान या तृतीयपंथींनी १९ वर्षीय तरुणाला घरी बोलावून त्याच्यावर लिंग बदलण्यासाठी दबाव आणला. त्यानंतर या मुलाला कोंडून ठेवत त्याला श्वानांसोबत लैंगिक कृत्य करण्यास प्रवृत्त केले व त्याचे व्हिडिओ बनविले. या व्हिडिओच्या माध्यमातून आरोपींनी पीडितेकडून पैशांची मागणी करत धमकावले. काही दिवसांपूर्वी त्यांनी या मुलाला सुरत येथे नेत त्याचे लिंग बदलून शस्त्रक्रिया केली. त्यानंतर त्याला घरी कामावर ठेवून घेतले; मात्र, होणाऱ्या त्रासाला कंटाळून पीडित मुलाने तेथून पळ काढत मालवणी पोलिसांत तक्रार दाखल केली.

### घाटकोपर शाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा

**मुंबई :** घाटकोपर पश्चिमेकडील श्रेयस सिनेमाजवळ असलेल्या केव्हीके घाटकोपर स्कूलमध्ये सकाळच्या सत्रात इयत्ता पाचवी ते दहावीचे वर्ग भरतात. सोमवारी सकाळच्या सत्रातील मधली सुट्टी झाल्यानंतर इयत्ता पाचवी ते आठवीतील काही मुलांनी शाळेच्या उपाहारगृहातील वडापाव खाल्ला. त्यानंतर जवळपास १५ ते १६ मुलांना उलट्या होऊ लागल्या. त्यामुळे शाळेतील शिक्षकांनी तातडीने जवळील महानगरपालिकेच्या दवाखान्यातील डॉक्टरांना बोलवले. तसेच, काही पालकांनी त्यांच्या मुलांना खासगी रुग्णालयामध्ये धाव घेतली. विषबाधा झालेल्या तीन मुलांना घाटकोपरमधील राजावाडी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले.

### हिंजवडीतील तरूणीचा दुर्दैवी मृत्यू

**पुणे :** सोमवारी (दि.१७) दुपारी प्रतिष्ठित कोलते पाटील लाईफ रिपब्लिक हाऊसिंग सोसायटीजवळ डंपरने झालेल्या अपघातात एका तरुणीचा मृत्यू झाला. ती तरुणी तिच्या वडिलांच्या दुचाकीवर मागे बसली होती. तन्वी साखरे (२०) असे मृत तरूणीचे नाव आहे. हा अपघात दुपारी दीड वाजताच्या सुमारास घडला. पोलिसांनी सांगितले की, दुचाकीस्वाराचा तोल गेला आणि त्यांच्यासह मागे बसलेली त्यांची मुलगी तन्वी दोघेही रस्त्यावर पडले. दुर्दैवाने तन्वी ज्या ठिकाणी पडली त्या ठिकाणावरून ट्रक जात असल्याने तो तिच्या शरीरावरून गेला. त्यामुळे तिचा जागीच मृत्यू झाला असून दुचाकीचालक गंभीर जखमी आहेत.

## जिल्ह्यात ९५९ उमेदवारी अर्ज दाखल

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील १० नगर परिषदांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया दि. १० नोव्हेंबरपासून सुरू झाली. सोमवारी (दि.१७) अखेरच्या दिवशी एकूण ९५९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यात ९०० नगरसेवक व ५९ नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या दहा नगरपरिषदांच्या थेट नगराध्यक्षपदासाठी १०, तर नगरसेवकपदासाठी २१७ जागांसाठी निवडणूक होणार आहे. सोमवारी अखेरच्या दिवशी जिल्ह्यात नगरसेवकपदासाठी ९०० आणि नगराध्यक्षपदासाठी ५९ अर्ज दाखल झाले आहेत. त्यात खोपोली नगरपरिषदेमध्ये नगरसेवकपदासाठी १८८ तर नगराध्यक्षपदासाठी ७ अर्ज दाखल झाले आहेत. अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी ६ तर नगरसेवकपदासाठी ७५ अर्ज भरण्यात आले आहेत. श्रीवर्धनच्या नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवकपदासाठी ६८ अर्ज दाखल झाले आहेत. मुरूड-जंजिराच्या नगरसेवक पान २ वर

## शेततळ्यातील मासे मृतावस्थेत

### प्रदूषण नियंत्रण मंडळाचा प्रत्यक्ष पाहणी अहवाल





**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

धाकटे शहापूर परिसरात एमआयडीने सिनारमास कंपनीपर्यंत पोहोच रस्त्यासाठी भराव केला आहे. हा भराव स्लॅग तसेच माती, मुरूम याचा वापर करून करण्यात आल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले असून, त्या पद्धतीने अहवाल तयार करण्यात आला आहे. यामध्ये सुजित पाटील यांच्या तलावातील मासे मृत झाले असून, तलावातील पाणी पांढरट आणि गढूळ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सीमांकनाच्या नावाखाली सिनारमास कंपनीपर्यंत पोहोच रस्ता तयार करण्याची हालचाल दोन दिवसांपूर्वी सुरु झाली. यावेळी धेरंड, शहापूरमधील ग्रामस्थ, पान २ वर

### कांदळवन तोडीची पाहणी

सिनारमास कंपनीपर्यंत पोहोच रस्ता तयार करण्यासाठी भरावाचे काम गेल्या दोन दिवसांपासून सुरू झाले आहे. मात्र, भराव करीत असताना कांदळवनाची मोठ्या प्रमाणात तोड झाली. या घटनेची माहिती वन विभागाला मिळताच त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून कांदळवनाची तोड करू नये, अशी सूचना दिली.

> प्रत्यक्ष पाहणी अहवाल करण्यात आला. धेरंड-शहापूर येथील प्रस्तावित सीनारमास प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. माती, मुरुम व स्लॅगचा वापर करण्यात आला आहे. शेतामधील तळ्यामध्ये व किनाऱ्यावर स्लॅग आढळून आला आहे. तळ्यातील मासे, मृतावस्थेत आढळून आले आहेत. पाण्याचा व स्लॅगचा नमुना गोळा करण्यात आला आहे.
>
> – डॉ. गजानन खडकीकर, क्षेत्र अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ

## पुण्यात अल्पवयीन तरूणाचा खुन

**। पुणे । प्रतिनिधी ।**

वडगाव येथे सोमवारी (दि.१७) एका तरुणावर कोयत्याने वार करून तसेच दगड घालून निर्घृण हत्या केल्याची घटना घडली आहे. सिंहगड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंहगड महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील मिनाक्षीपुरम सोसायटीच्या पार्किंगमध्ये ५ जणांनी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास तरुणावर कोयत्याने वार करुन दगड घालून त्याचा निर्घृण खून केल्याचे समोर आले आहे. तौकीर शेख (२३) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. येथील कृष्णकुंज इमारतीच्या पार्किंगमध्ये तौकीर शेख बसला होता. दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास त्याठिकाणी पान २ वर

## मुरूडमध्ये मविआतर्फे उमेदवारी अर्ज दाखल

### थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवार ॲड. अंकिता माळी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मुरूड नगरपरिषद नगराध्यक्ष व नगरसेवकपदाच्या १२ जागांसाठी शेकापसह मनसे व महाविकास आघाडीच्यावतीने उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. त्यात थेट नगराध्यक्ष पदासाठी शेकापच्या ॲड. अंकिता माळी यांनी अर्ज दाखल केला आहे.

मुरूड नगरपरिषदेच्या वीस जागांसाठी ही लढत आहे. सोमवार दि.१० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली. यावेळी थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी शेकापच्या ॲड. अंकिता माळी यांनी अर्ज भरला आहे. तसेच, सदस्यपदासाठी प्रभाग दोनमधून संकेत अपराध (शेकाप), प्रभाग तीनमधून सिध्देश सुरते (शेकाप), प्रभाग चारमधून अनंत म्हशेलकर (शेकाप), रुमण्णा म जगावकर (शेकाप), प्रभाग पाचमधून मनीष माळी (शेकाप), प्रभाग सहाम धून मनीष रामा (मनसे), युविका भगत (मनसे), रुमण्णा मजगांवकर (शेकाप), अंकित गुरव (मनसे), प्रभाग आठमधून प्रयास वरसोलकर (शेकाप), प्रभाग नऊमधून रसिका मयेकर (शेकाप) व प्रभाग दहामधून जागम पुळेकर (मनसे) यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

यावेळी शेकाप मुरुड तालुका चिटणीस विजय गिदी, तुकाराम पाटील, चंद्रकांत कमाने, मनोहर बैले, दिपेश गिदी, मधुकर ढेबे, गणेश पुगांवकर, सिध्देश सुर्ती, प्रकाश मयेकर, यश वरसोलकर, अनंत पाडगे, उमेश अपराध, आशिष पाडगे, शैलेश काते, अमोल पाटील, अनंत म्हसकर, आशिष हांडेकर, अशोक विरकूड, रुपेश धोत्रे, नीता गिदी, सुप्रिया गिदी, नंदा पाटील, अरुण मढवी, मेघराज पाटील, दश्नना वरसोलकर, जितेंद्र गार्डी, अलिबाग तालुका पुरोगामी युवक अध्यक्ष विक्रांत वार्डे, निशिकांत कोळसे, यश पाटील तसेच मनसेचे जागन पुळेकर, प्रवेश पालशेतकर, विघ्नेश जगताप, युवराज भगत, मनीष शाया, प्रवेश पुळेकर, सिध्देश खेडकर, आकाश खोत, केतन डोंगरीकर, पराग आरेकर, पंकज जगताप, गिरीधर सतावडेकर, ओंकार मानकर, अथर्व खोत, रुपेश भोईर, ऋनून साळुंखे, सिध्देश पालशेतकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## संसदेतही महिला खासदारांचे शोषण


सुप्रिया सुळे यांचे वक्तव्य

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

समाजातील सर्व महिलांच्या समस्या सारख्याच असतात. संसदेत महिलांचे शोषण होत नाही, असे अनेकांना वाटते. मात्र, ते खरे नाही. संसदेतही महिला खासदारांचे शोषण होते. त्याचे प्रकार वेगवेगळे असतात. ते महाविद्यालयातील रॅगिंगसारखे नसते. व्यक्तिनुरूप त्याची व्याख्या बदलते. महिलांना साड्यांच्या रंगावरून दिलेल्या प्रतिक्रिया यादेखील शोषणाचाच एक प्रकार आहे. महिलांकडून पुरुषांचे केस, पान २ वर

## रेवदंड्याच्या उपसरपंचासह सदस्याला दणका

### शासकीय जागेत अतिक्रमण करून बांधकाम केल्याचा ठपका

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शासकीय गुरचरण जागेत अतिक्रमण करून बांधकाम केल्याचा ठपका ठेवत रेवदंडा ग्रामपंचायतीच्या उपसरपंच मंदा बळी व सदस्य दीक्षा बळी या दोघींवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी त्यांचे सदस्यपद रद्द करण्याचे आदेश शुक्रवारी (दि.१४) दिले आहेत. अलिबागमधील त्यांच्या दालनात झालेल्या अंतिम सुनावणीत हा निर्णय घेण्यात आला. रेवदंडा येथील अर्जदार सुशील सुर्वे यांच्यावतीने ॲड. परेश देशमुख यांनी काम पाहिले. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने भाजपच्या उपसरपंच मंदा बळी आणि दीक्षा बळी यांना दणका मिळाला आहे.




### जिल्हाधिकाऱ्यांकडून निलंबनाचे आदेश

ॲड. परेश देशमुख यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, रेवदंडा ग्रामपंचायतीची ६ नोव्हेंबर २०२३ मध्ये निवडणूक झाली. या निवडणुकीत मंदा माणिक बळी व दीक्षा अजित बळी निवडून आल्या. मंदा बळी यांच्याकडे उपसरपंचपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. मात्र, मंदा बळी यांचा मुलगा नंदलाल बळी यांनी मोठे बंदर येथे शासकीय गुरचरण जागेतील ६७.१७ चौ. मीटर क्षेत्रामध्ये अतिक्रमण करून बांधकाम केले. त्याचा घर क्रमांक ३०८४ हा आहे. तसेच सदस्य दीक्षा बळी यांचे पती अजित बळी यांनी २०.९१ चौ.मी. क्षेत्रामध्ये बांधकाम करून घर बांधले. त्याचा घर क्रमांक ३२०४ हा आहे. उपसरपंच मंदा बळी आणि सदस्या दीक्षा बळी यांनी आपल्या पदाचा गैरवापर करीत आगल्याचीवाडी थेरोंडा येथे बांधकाम केल्याची तक्रार रेवदंडा येथील सामाजिक कार्यकर्ते सुशील सुर्वे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली. शासनाची जागा असल्याचे माहिती असतानादेखील त्यांनी पदाचा दुरुपयोग करून बांधकाम केल्याचा आरोप त्यांनी केला. याप्रकरणी पान २ वर

### मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपनीच्या सहकार्याने कार्यक्रम | स्थानिकांचा विरोध डावलून परवानगी दिल्याने संताप

# म्युझिक फेस्टिवलच्या नावाखाली मद्यविक्री?

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पालिका हद्दीतील खारघर वसाहतीत २२ आणि २३ नोव्हेंबरदरम्यान 'रोलिंग लाऊड इंडिया म्युझिक फेस्टिव्हल'चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त जगातील सर्वात मोठा हिप-हॉप महोत्सव भारतात साजरा करण्यात येत आहे. यादरम्यान मद्य विक्रीचे स्टॉल लावण्यासाठी परवानगी मागण्यात आल्याने यावरून खारघर वसाहतीत वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. वसाहतीत कोणत्याही प्रकारची मद्य विक्री करणारी दुकान सुरु होऊ नये, याकरिता प्रयत्न करणाऱ्या सामाजिक संस्थांकडून कार्यक्रमाला विरोध दर्शवला जात आहे.




### लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

खारघर वसाहतीत कोणत्याही प्रकारच्या मद्य विक्री करण्याला परवानगी देण्यात येऊ नये यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत आवाज उठवला आहे. काही सामाजिक संस्थादेखील याकरिता आग्रही आहेत. अशा वेळेला एका मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपनीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला परवानगी देण्यात येऊ नये, अशी मागणी सामान्य खारघरकर नागरिक करत आहेत.

मियामी ते लॉस एंजेलिस, लॉस एंजेलीस ते पोर्तुगाल आणि पोर्तुगाल ते थायलंड, रोलिंग लाऊड हे हिप-हॉप संस्कृतीचे जागतिक कनेक्टर आहे. ही संस्था आंतरराष्ट्रीय सुपरस्टार आणि स्थानिक प्रतिभा एकाच मंचावर एकत्र आणते. खारघर येथील कार्यक्रमादरम्यान दररोज सुमारे २५,००० लोकांची उपस्थिती कंपनीच्या माध्यमातून अपेक्षित पकडण्यात आली आहे. याकरिता मंडप उभारण्याची परवानगी सिडकोकडून मागण्यात आली आहे. सिडको व्यवस्थापनाकडून अटी आणि शर्थींची पूर्तता करण्याच्या अटीवर ही परवानगी दिली आहे. मात्र, कार्यक्रमासाठी वाहतूक विभाग, पनवेल पालिका परवाना विभाग तसेच अग्निशमन दलाची परवानगी पान २ वर

> कार्यक्रमाविरोधात पक्षातील काही माजी नगरसेवकांकडून विरोध दर्शवण्यात आला आहे. आयोजकांकडून कायमस्वरूपी मद्य विक्री केली जाणार नसल्याने जनभावनेचा विचार करून निर्णय घेतला जाणार आहे.
>
> – प्रशांत ठाकूर, आमदार, पनवेल

> अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत आमच्या विभागाकडे कोणत्याही प्रकारचा अर्ज अद्यापही दाखल करण्यात आलेला नाही.
>
> – रविकिरण कोळे, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, रायगड

## शेख हसीनांना सुनावली मृत्युदंडाची शिक्षा

**। ढाका । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशच्या एका न्यायालयाने माजी पंतप्रधान शेख हसीना यांना मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये दोषी ठरवले आहे. ज्यामध्ये नि:शस्त्र नागरिकांवर गोळीबार करणे समाविष्ट आहे. न्यायालयाने त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. शेख हसीना यांनी निदर्शकांना दडपण्यासाठी आणि मारण्यासाठी प्राणघातक शस्त्रे आणि ड्रोन वापरण्याचे आदेश दिले होते, असे न्यायालयाने आढळून आले. या गंभीर गुन्ह्यासाठी त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.



न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे की, मानवतेविरुद्धचे हे गुन्हे शेख हसीना आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या आदेशावरून करण्यात आले होते. पहिल्या आरोपाखाली, शेख हसीना परिस्थिती हाताळण्याची आणि हिंसाचार रोखण्याची त्यांची जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरल्या. या प्रकरणात पोलीस महानिरीक्षक (आयजीपी) दोषी असू शकतात, हेदेखील पुराव्यांवरून दिसून आले. न्यायालयाने अहवाल दिला की, १९ जुलैनंतर गृहमंत्र्यांच्या निवासस्थानी अनेक बैठका झाल्या. ज्यामध्ये विद्यार्थी आंदोलन पान २ वर

# रानसई येथे शेती अवजारे, मच्छीमार बोटींचे लोकार्पण

**| उरण | प्रतिनिधी |**

रानसई ग्रामपंचायत ही उरण तालुक्यातील १०० टक्के आदिवासी वस्ती असणारी ग्रामपंचायत आहे. याठिकाणी खैरकाठी, मार्गाचीवाडी, बंगल्याची वाडी, खोंड्याची वाडी, साग वाडी आणि भुऱ्याची वाडी अशा सहा आदिवासी वाड्या आहेत. या वाड्यांमधील ४३० कुटुंबांना प्रत्येकी एक-एक फावडा, टिकाव, पहार, घमेल, पंजा अशी सहा शेती अवजारे आणि पाच मच्छीमार आदिवासींना विना यांत्रिकी बोटींचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी ओएनजीसीतर्फे भावना आठवले, संजीव मोहन, गौरव पतंगे, अभिषेक पाटील तसेच साद फाऊंडेशन संस्थेचेचे सर्व प्रमुख प्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते. रानसई येथील बहुतांशी आदिवासी कुटुंब हे भाजीपाला मोलमजुरी आणि मासेमारी व्यवसाय करून आपली उपजीविका करत आहेत त्यांना त्यांच्या रोजच्या वापरातील वस्तू मिळाल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. यापुढे देखील विविध व्यवसायाच्या माध्यमातून येथील आदिवासींना रोजगार निर्माण होणार असेल तर नक्कीच आपण ओएनजीसीच्या सीएसआर फंडातून प्रयत्न करू, असे भावना आठवले आणि संजीव मोहन यांनी मनोगतात व्यक्त केले. यावेळी रानसईचे सरपंच, उपसरपंच, सदस्य प्रमुख कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने आदिवासी ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन कुलकर्णी यांनी केले. तर, सूत्र संचालन सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांनी केले.



## पान १ वरून

## अवजड वाहनांना बंदी

वेळ लागतो. त्याचबरोबर रुग्णवाहिकांना या वाहतूक कोंडीत अडकल्याने रुग्णाच्या जीवितास धोका संभावू शकतो. त्यामुळे अपघात कमी होण्यासाठी तसेच स्थानिक नागरिक, विद्यार्थी, पर्यटक व जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांचा प्रवास सुखकर होण्याच्या दृष्टीकोनातून मांडवा जेट्टी ते अलिबाग या मार्गावर दररोज सकाळी ८ ते दु. १२ वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत जड-अवजड वाहनांकरिता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वाहतूकबंदी अधिसूचना जारी केली आहे.

## शेततळ्यातील मासे मृतावस्थेत

शेतकऱ्यांनी विरोध केला. शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून बैठक घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी, ही भूमिका शेतकऱ्यांनी घेतली. तरीदेखील पोलीस बळाचा वापर करीत गेल्या दोन दिवसांपासून शेतकरी, स्थानिकांना दाबण्याचा प्रयत्न एमआयडीने सुरु केला आहे.

भूसंपादन अधिनियम २०१३ च्या कायद्याप्रमाणे १ कोटी ९२ लाख ३७ हजार ८०३ रुपये प्रतिएकरी मोबदला देण्यात यावा, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे संपादित क्षेत्रास १५ टक्के विकसित भूखंड मिळावा, शेतकऱ्यांच्या मुलांना योग्य प्रशिक्षण देऊन त्यांना वारसा हक्काने प्रकल्पामध्ये नोकरीत सामावून घ्यावे, पुनर्वसन कायद्याप्रमाणे फायदे मिळाले पाहिजेत, शेतघरे, शेततळी, गुराढोरांचे गोठे, फळ व सावली देणारी झाडे आहेत, या जागेत मासेमारी करीत आहेत, त्या माध्यमातून स्थानिक शेतकरी पूरक उत्पन्न घेत आहेत. या बाबींचा विचार मूल्यांकन करण्यात यावा, भूमीहीन होणाऱ्या बाधित शेतकऱ्यांना शेतकरी दाखला देण्यात यावा, अशा अनेक मागण्यांसाठी शेतकरी गेल्या दोन दिवसांपासून लढा देत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक होत नाही, तोपर्यंत काहीही काम करू नये, अशी विनंतीदेखील शेतकरी व ग्रामस्थ करीत आहेत. मात्र, शेतकऱ्यांच्या या मागणीकडे दुर्लक्ष करीत भरावाचे काम सुरुच करण्यात आले. प्रदूषण नियंत्रण मंडळाची कोणतीही परवानगी न घेता भराव करण्यात आल्याची बाब ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी संबंधित विभागाच्या निदर्शनास आणून दिली. अखेर रविवारी दुपारनंतर वन विभागासह प्रदूषण नियंत्रण मंडळाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. या पाहणीत कांदळवनांची कत्तल झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळातील क्षेत्र अधिकारी डॉ. गजानन खडकीकर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

सिनारमास या प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम सुरू आहे. माती, मुरूम व स्लॅगचा वापर करण्यात आला आहे. हा स्लॅग एमआयडीसी व ठेकेदार यांच्यातर्फे टाकण्यात आला आहे. ठेकेदारामार्फत भरावासाठी गट क्रमांक २६४, २६५ मधील जागेत स्लॅग टाकण्यात आला आहे. हा स्लॅग सुजित पाटील यांच्या शेतामधील तळ्यामध्ये तसेच तळ्यात किनाऱ्यावर आढळून आला आहे. तळ्यात मासे मृतावस्थेत आढळून आले असून, पाणी पांढरट व गढूळ रंगाचे आढळले असल्याचा अहवाल तयार करण्यात आला आहे. पाण्याचा व स्लॅगचा नमुना गोळा करण्यात आला आहे, असे अहवालात नमूद केले आहे.

सिनारमास कंपनीपर्यंत पोहोचरस्त्यासाठी एमआयडीसीने स्लॅग व दगड, माती टाकून भराव केला. कांदळवन तोडीबरोबरच प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांना धाब्यावर बसवत काम केल्याने कांदळवनासह महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामे केले. मात्र, एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी (दि.१७) सकाळी भरावाला पुन्हा सुरुवात केली. या प्रकारामुळे एमआयडीसीचा मनमानी कारभार उघड झाला आहे. पोलीस बळाचा आधार घेत एमआयडीने ग्रामस्थांची धरपकड सुरु केली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.

सिनारमास कंपनीपर्यंत पोहोच रस्त्यासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीचा अद्यापपर्यंत मोबदला शेतकऱ्यांना दिला नाही. शेतकरी, स्थानिकांना विश्वासात न घेता अनधिकृतपणे रस्त्यासाठी भरावाचे काम सुरु करण्यात आले आहे. कंपनीतील स्लॅगचा भराव करताना शेतकऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार केली आहे. या भरावामुळे तलावातील मासळी मृत पावली आहे. शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देणे आवश्यक आहे. भराव करताना कोणालाच विश्वासात घेतले नाही. असे रुपेश पाटील यांनी सांगितले.

**एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी बोलणे टाळले**

गेल्या चार दिवसांपासून धेरंड, शहापूर परिसरातील शेतकरी त्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढा देत आहेत. एमआयडीसीमार्फत भराव केला जात आहे. याबाबत एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता, त्यांनी याबाबत बोलणे टाळले. त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती देणे टाळले.

**पोयनाड पोलीस ठाण्यात तक्रार**

धाकटे शहापूर येथील सुजित पाटील यांचे शहापूर येथील सर्व्हे नंबर २६५/२ मध्ये शेतजमीन, शेततळे व राहत घर आहे. या ठिकाणाहून शहापूर-धेरंड औद्योगिक पोहोच रस्ता जात आहे. प्रस्तावित भूसंपादनाखाली नसलेल्या मालकीच्या जागेत एमआयडीसीने बेकायदेशीर भराव केला आहे. या भरावाला विरोध असताना पोलीस बंदोबस्तामध्ये भराव करण्यात आला. त्यात स्लॅगचा वापर करण्यात आला आहे. तो भराव पाटील यांच्या शेततळ्यामध्ये गेला असून, तळ्यातील मासळी मृत पावली आहेत. याप्रकरणी सुजित पाटील यांनी पोयनाड पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे.

## पुण्यात अल्पवयीन तरूणाचा खुन

५ जण आले आणि त्यांनी कोयत्याने तौकीर शेखवर वार केले. तो रक्ताच्या थारोळ्यात पडला असताना त्याच्यावर दगड मारुन त्याचा निर्घृण खून केला. त्यानंतर हे हल्लेखोर पळून गेले. यातील दोन आरोपी अल्पवयीन असल्याचे पोलिसांकडे प्राथमिक माहिती प्राप्त झाली असून सिंहगड रस्ता पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## रेवदंड्याच्या उपसरपंचासह सदस्याला दणका

ॲड. परेश देशमुख यांच्यामार्फत जिल्हाधिकारी न्यायालयात अपील दाखल केले. या तक्रार अर्जावरील सुनावणी शुक्रवारी जिल्हा दंडाधिकारी यांच्या न्यायालयात झाली. ॲड. परेश देशमुख यांनी सुर्वे यांच्या बाजूने केलेला युक्तीवाद व पुरावे ग्राह्य धरून जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी यांनी मंदा बळी आणि दीक्षा बळी यांना दोशी मानत त्यांचे उपसरपंच व सदस्यपद रद्द करण्याचे आदेश दिले. त्यामुळे रेवदंडा येथील भाजपसाठी हा मोठा दणका मानला जात आहे. या निकालाबाबत ॲड. परेश देशमुख व तक्रारदार सुशील सुर्वे यांचे तसेच या प्रकरणात संतोष उर्फ बाबू मोरे यांनी पुरावे व अन्य कागदपत्रे गोळा करून देण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. त्यामुळे शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्याकडून दोघांचेही अभिनंदन करण्यात आले आहे.

## शेख हसीनांना सुनावली मृत्युदंडाची शिक्षा

दडपण्याचे निर्देश देण्यात आले. शेख हसीना यांनी निदर्शकांना लक्ष्य करण्यासाठी कोअर कमिटीला आदेश दिले. तर, अवामी लीग समर्थकांनी निदर्शकांना सक्रियपणे त्रास दिला. चौकशीदरम्यान आयजीपींनी कथित त्यामध्ये आपला सहभाग कबूल केला. न्यायालयाने एकूण ५४ साक्षीदारांच्या साक्षी ऐकल्या. असा निष्कर्ष काढला की, ही संख्या पुरेशी आहे. देशभरातून गोळा केलेले पुरावे आणि विविध स्त्रोतांकडून मिळालेले अतिरिक्त पुरावेदेखील तपासण्यात आले. शिवाय, संयुक्त राष्ट्रांच्या एका एजन्सीच्या अहवालाचा अभ्यास करण्यात आला. त्यात असा निष्कर्ष काढण्यात आला की, शेख हसीना आणि गृहमंत्र्यांच्या आदेशावरून मानवतेविरुद्ध गुन्हे केले गेले. मात्र, बांगलादेशचे माजी पोलीस प्रमुख चौधरी अब्दुल्ला अल-मामुन यांना न्यायाधिकरणाने मृत्युदंडापासून मुक्त केले आहे. हसीनाच्या सत्तेवरून हकालपट्टीनंतर सरकारी साक्षीदार बनलेले मामुन यांनी कडक सुरक्षेत साक्ष दिली. निकालात एक महत्त्वाचा घटक बनले. २०१० मध्ये न्यायाधिकरणाची स्थापना झाल्यानंतर सरकारी साक्षीदार बनणारा आणि सरकारी पक्षाला पाठिंबा देणारा मामुन हा पहिला आरोपी आहे.

## जिल्ह्यात ९५९ उमेदवारी अर्ज दाखल

पदासाठी ७४ तर नगराध्यक्षपदासाठी ५ अर्ज दाखल झाले आहेत. रोह्याच्या नगराध्यक्ष पदासाठी ३ तर नगरसेवक पदासाठी ७८ अर्ज दाखल झाले आहेत. महाडमध्ये नगराध्यक्ष पदासाठी ७ तर नगरसेवक पदासाठी ७४ अर्ज दाखल झाले आहेत. पेणमध्ये नगराध्यक्ष पदासाठी ५ अर्ज दाखल झाले असून नगरसेवक पदासाठी १०३ अर्ज प्राप्त झाले आहेत. उरणमध्ये नगरसेवक पदासाठी ७८ तर नगराध्यक्ष पदासाठी ९ अर्ज दाखल झाले आहेत. कर्जतमध्ये नगरसेवक पदासाठी ९२ तर नगराध्यक्ष पदासाठी आठ अर्ज दाखल झाले आहेत. माथेरानमध्ये नगरसेवक पदासाठी ७० तसेच नगराध्यक्ष पदासाठी ४ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## संसदेतही महिला खासदारांचे शोषण

कपडे याबाबत टिपण्णी केली जात नाही. मात्र, पुरुषांकडून सर्रासपणे केली जाते. पुरुषांनी कामाच्या ठिकाणी व्यावसायिक पद्धतीचे वागणे ठेवायला हवे, असे ठाम मत राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी रविवारी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय महिला परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील महिला पत्रकारांचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सुप्रिया सुळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना खा. सुळे यांनी, पुरुषांच्या चुकीच्या वृत्तीवर बोट ठेवताना त्यांच्या आयुष्यातील पुरुषांचे स्थानही अधोरेखित केले. माझ्या आयुष्यातील सर्व मोठे निर्णय पुरुषांनीच घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मताधिकार दिला. जोतिबा फुले यांनी पुढाकार घेतला तेव्हा सावित्रीबाई शिक्षित झाल्या, अशी अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे प्रत्येक पुरुष वाईट नसतो, असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## म्युझिक फेस्टिवलच्या नावाखाली मद्यविक्री?

आवश्यक आहे. त्याच सोबत मद्य विक्रीचे स्टॉल उभारण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे. असे असताना कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या कंपनीकडून राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे परवानगीसाठी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला नसल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. तसेच, मंडप उभारण्यासाठी पनवेल पालिकेकडूनदेखील कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नसल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## PANVEL MUNICIPAL CORPORATION
## CORRIGENDUM FOR TENDER NOTICE

**Tender No: - PMC/CE/PMAY/212/2025-26- Second Call**

**CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)**

INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF Mixed Use Development under PMAY with Rehabilitation of Slum Dwellers of Plot No. 307A at. Panvel, Shivajinagar, Dist. Raigad. Maharashtra 410206

Offers by way of e-tendering (Lump Sum PPP form) are invited by the Commissioner, Panvel Municipal Corporation from contractors in e-tendering system for following works.

| Name of work | Amount of E.M.D (Rs) | Time limit in Calendar months | Cost of Tender Document (Rs.) |
|---|---|---|---|
| Mixed Use Development under PMAY with Rehabilitation of Slum Dwellers of Plot No. 307A At. Panvel, Shivajinagar, Dist. Raigad, Maharashtra 410206. | Rs. 30,00,000/- | 36 Months (Including Monsoon) | Rs.5,000/-+ 18% GST Total Rs.5900/ (Non refundable) |

**Last date of submission of tender has been extended up to 01/12/2025**

The details of above works, such as Security Deposit, Earnest Money Deposit, Terms & Conditions of the Tender are available on website www.mahatenders.gov.in Tenders for these works are to be submitted by e-tendering system. Bidders can avail the e-tender document from 06/11/2025 from 5.00 P.M. to 30/11/2025 up to 5.00 PM. Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last date of Submission by way of e-tendering will be 01/12/2025 up to 5.00 PM. Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept or reject any or all tender without giving any reason thereof.

Sd/-
**Additional Commissioner-I**
**Panvel Municipal Corporation,**
**Panvel -410 206**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| पुनम ए. डोगरा | २२/१५/अ | १० | २७३.०० | २७ | ३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.गौरकामथ,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१
दिनांक :- २९/०९/२०२५

सही / -
**शंकेश राजेश ठाकरे**
अधिवक्ता
मो. नं. ९२८४८९२३८७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक स्नेहा संतोष मगर, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | १३५४/१ | ०-८३-२० | ४६.२५ |

**वर नमुद जमिन मिळकती पैकी क्षेत्र ०-०६-७० हे. आर. मध्ये विक्रेता यांचे असणारे अविभक्त ०-०३-३५ हे.आर. क्षेत्र आणि त्यामध्ये असणारी ग्रामपंचायत चौल मालमत्ता क्र. ३६२२ या घर मिळकती संदर्भात**

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट रस्ता वहिवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रारी/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहित धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १७/११/२०२५
मोबा. ९०२८८५१२८०

**ॲड.विराज शरद अंबुकर**
मु.हनुमान वाडी, थेरोंडा, पो.चौल
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र.५४२/२०२५

शौकत अली युनुस रोहेकर
मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. फहमिदा महमुद राऊत यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड या ठिकाणी दि.१३/१२/१९७० रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१७/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि. १३/१२/१९७० रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. १३/१२/१९७० रोजी मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : १३/११/२०२५

**(दशरथ काळे)**
कार्यकारी दंडाधिकारी
माणगाव, जि. रायगड

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र.५४३/२०२५

आदम युनुस रोहेकर,
रा. मोर्बा, ता. माणगाव — अर्जदार
जि रायगड
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा — सामनेवाले
ता. माणगाव, जि. रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. आदम युनुस रोहेकर यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड या ठिकाणी दि.१/०६/१९६७ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१७/९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि. ०१/०६/१९६७ झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. ०१/०६/१९६७ रोजी मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : १३/११/२०२५

**(दशरथ काळे)**
कार्यकारी दंडाधिकारी
माणगाव, जि. रायगड

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात जिल्हाधिकारी कार्यालय आवार,अलिबाग, जि. रायगड

क्रमांक/आरटीएस/अपील क्र. ३८१/२०२५
दिनांक : ११/११/२०२५

१ श्री. नारायण कानु चौलकर
रा. वडवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड — अपिलार्थी
विरुद्ध
१ श्री. संतोष पांडूरंग भायदे
२ श्री. अजिंक्य प्रशांत कुलकर्णी
३ श्री. प्रशांत त्र्यंबक कुलकर्णी — उत्तरार्थी
४ श्रीम. हरप्रीतकौर नरेंद्र भल्ला
सर्व रा. वडवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे वडवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील स.नं./गट नं. ७५/२, क्षेत्र १.१३.०० हे. आर. आकार ०.५० रु. पैसे, या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि. १५/०९/२०२५ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि. २५/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड - अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी उपविभागीय अधिकारी, माणगाव यांचे कार्यालय, माणगाव येथे निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : माणगांव
दिनांक : ११/११/२०२५

सही/-
अपर जिल्हाधिकारी रायगड
अलिबाग करीता

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र.२५०/२०२५

निकेश मनोहर शिंदे
रा. वडपाले, ता. माणगाव — अर्जदार
जि रायगड
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
वडपाले, ग्रामपंचायत वडपाले
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. निरा भागोजी शिंदे यांचा जन्म/मृत्यू मौजे वडपाले, ता. माणगांव, जि. रायगड या ठिकाणी दि.१७/०८/१९६५ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१६/१०/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू वडपाले येथे दि. १७/८/१९६५ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. १७/०८/१९६५ रोजी वडपाले, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : १७/११/२०२५

**(दशरथ काळे)**
कार्यकारी दंडाधिकारी
माणगाव, जि. रायगड

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र.२३६/२०२५

शौकत अली युनुस रोहेकर
मोर्बा — अर्जदार
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. महमद इसाफ शे आदूम रोहेकर यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा, ता. मोर्बा, जि. रायगड या ठिकाणी दि.२९/०२/१९६८ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१७/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि. २९/०२/१९६८ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. २९/०२/१९६८ रोजी मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : १३/११/२०२५

**(दशरथ काळे)**
कार्यकारी दंडाधिकारी
माणगाव, जि. रायगड

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पाझर ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्यांच्या विद्यमान मालकांकडून सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध असल्याची खात्री मालकांनी दिलेली आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| अनु. | गट क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ४४३ | ०-१५-२० | ३.५६ | श्री.अशोक पांडुरंग म्हात्रे |

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १७/११/२०२५

सही/-
**ॲड : महेश एस म्हात्रे**
ऑफीस नं.१, शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठ रोड, केळकर नाका, अलिबाग
मो.नं.९२२६८४७०७७

## निवडक



### पालिका आरक्षण सोडतीत गोंधळ

**पनवेल :** पनवेल महानगरपालिकेच्या आरक्षण सोडतीदरम्यान सोमवारी (दि. १७) पुन्हा एकदा प्रचंड गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. विरोधी पक्षातील कार्यकर्त्यांनी आक्षेप नोंदवत निवडणूक अधिकाऱ्यांच्या समोर बसून ठिय्या आंदोलन केले. यामुळे सभागृहात काही वेळ मोठा गदारोळ पाहायला मिळाला. शेकाप आणि काँग्रेसच्या प्रतिनिधींनी आरक्षण प्रक्रियेत घोळ असल्याचा आरोप करीत निवडणूक अधिकारी तसेच पालिका आयुक्त यांना याबाबतचे निवेदन सादर केले. पनवेल महानगरपालिका आरक्षण सोडत आद्य क्रांतीवीर वासुदेव फडके नाट्यगृहामध्ये होती




### सायन महामार्गावर सीएनजीचा तुटवडा

**पनवेल :** सायन-पनवेल महामार्गावरील नवी मुंबई ते पनवेल परिसरातील अनेक महानगर गॅस पंप बंद असल्याने वाहनचालकांची मोठी गैरसोय होत आहे. काही सीएनजी पुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी गॅस लाईन्स तात्पुरत्या बंद ठेवल्याने पंपांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. त्यामुळे रिक्षा, टॅक्सी तसेच खासगी वाहन चालक त्रस्त झाले असून, लांब अंतराचा प्रवास करणाऱ्यांना विशेष अडचणींचा सामना करावा लागत आहे.


●(छायाचित्र : संजय गायकवाड)

### महायुतीच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

**कर्जत :** कर्जत नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी, शिवसेना (शिंदे गट) आणि आरपीआय महायुतीच्या उमेदवारांनी कर्जत शहरात मोठे शक्तीप्रदर्शन करून उमेदवारी अर्ज सोमवार, दि.१७ नोव्हेंबर रोजी अर्ज दाखल करायच्या शेवटच्या दिवशी सादर केले. कर्जतमधील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून भाजपच्या नेत्या आमदार चित्रा वाघ, पनवेलचे आ. प्रशांत ठाकूर, कर्जत आ. महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, आरपीआयचे नेते राहुल डाळिंबकर यांच्यासह उमेदवार आणि कार्यकर्ते नगरपरिषद कार्यालयाकडे आले. यावेळी नगराध्यक्ष पदासाठी युतीच्या डॉ. स्वाती लाड यांनी दि.१७ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला तसेच महायुतीच्या सदस्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी कोणताही अनुचित प्रकारे घडू नये म्हणून कर्जत पोलीस ठाण्याच्यावतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



### शिवसेना शिंदे गटाचे शक्तीप्रदर्शन

**महाड :** महाडमध्ये सोमवार, दि. १७ नोव्हेंबर रेजी शिवसेना शिंदे गटाने शक्तीप्रदर्शन करत नगराध्यक्ष तसेच २० नगरसेवक पदांसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले. शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सुनील कविस्कर यांनी मोठ्या उत्साहात अर्ज दाखल केला. रॅलीची भव्य सुरुवात जाकमाता मंदिरापासून करण्यात आली. जाकमाता मंदिरात दर्शन घेऊन आणि देवीचा आशीर्वाद घेत रॅलीला प्रारंभ झाला. यावेळी मंत्री भरत गोगावले यांनी गांधेरी नाक्यावरील नवरेपीर बाबा दर्ग्यावर फुलांची चादर चढवून पुढे खालुचा गजरात, घोषणांच्या नादात ही रॅली उत्साहात अर्ज दाखल करण्यासाठी पुढे सरसावली. भगवे झेंडे, धनुष्यबाण निशाणीचे फलक आणि गर्दीमुळे संपूर्ण महाड शहरात निवडणुकीचे वातावरण तापले.

# तरुणांना 'ऑन दि स्पॉट' नोकरी



| पनवेल | प्रतिनिधी |

तालुक्यातील वावंजे या ठिकाणी शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने विभागातील बेरोजगार युवा आणि युवतींसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. या रोजगार मेळाव्याचे आयोजन अतुल म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा परिषद उमेदवार डी.बी. म्हात्रे यांच्यावतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक मतदारसंघाचे माजी आमदार बाळाराम पाटील होते.

यावेळी बाळाराम पाटील यांनी सांगितले की, शेतकरी कामगार पक्ष हा नेहमीच युवकांच्या भल्यासाठी काम करत असून, सध्या पनवेल तालुक्यात

- **शेकापकडून रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन**
- **शेकडो तरुणांना मिळाला हक्काचा रोजगार**

रोजगार युवकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, त्याचा विचार करून सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या आयोजनाचा लाभ येथील स्थानिक युवक आणि युवती घेतील, असा मला विश्वास वाटतो. यावेळी पनवेल तालुका पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, नारायण घरत, प्रकाश म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

**बाळाराम पाटील यांच्याकडून शुभेच्छा**

रोजगार मेळाव्यातून नोकरी मिळविलेल्या तरुणांच्या पाठीवर माजी आ. बाळाराम पाटील यांनी कौतुकाची थाप देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मेळाव्यात सहभागी झालेल्या कंपन्यांही बाळाराम पाटील यांनी धन्यवाद दिले. शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून समाजाच्या भल्यासाठी करता येईल तेवढे काम करणार असल्याची ग्वाही बाळाराम पाटील यांनी दिली.

या रोजगार मेळाव्यात १२ कंपन्या आल्या होत्या. त्यामध्ये जवळजवळ ९२ मुलांना ऑन द स्पॉट रोजगार देण्यात आला. सहभागी कंपन्यांमध्ये लिंक किड्स, एच.डी.एफ.सी, एस.बी.आय, कोटक ऍक्सिस स्टार्टर्स, आय.सी.आय.सी. बँक आणि खास करून पनवेल गव्हर्मेंट प्लेसमेंट ऑफिस हेसुद्धा सहभागी झाले होते. या रोजगार मेळावा यशस्वी करण्यासाठी वावंजे जिल्हा परिषद मतदार संघाचे उमेदवार डी.बी. म्हात्रे, पनवेल तालुका पंचायत समितीचे उमेदवार पराग भोपी, सरपंच मदन मते (कानपोली), भोलानाथ पाटील (वलप), मच्छिंद्र पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती पनवेल, ए.टी. पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# रो-रो जेट्टीला मच्छिमारांचा विरोध

| रेवदंडा | प्रतिनिधी |

**रेवदंड्यातील प्रस्तावित जेट्टीमुळे उपासमार?**

रेवदंडा समुद्र खाडीत उत्तरेस महाराष्ट्र सागरी मंडळाच्यावतीने जलवाहतूक रो-रो जेट्टी नव्याने बांधण्यात येणार आहे. या जेट्टीस कोळी बांधवांचा विरोध आहे. त्याबाबतचे निवेदन पत्र दर्यातरंग सागरी मच्छिमार वि.का.स. संस्था मर्यादित रेवदंडा-चौलच्यावतीने महाराष्ट्र सागरी मंडळास देण्यात आले आहे.

रेवदंड्यात सागरी जलवाहतुकीसाठी रो.रो. जेट्टी शासनाच्यावतीने बांधण्यात येत आहे. सदर ठिकाण रेवदंडा समुद्र खाडीत दर्यातरंग सागरी मच्छिमार वि.का.स.संस्था मर्यादित रेवदंडा-चौल या संस्थेचे कार्यक्षेत्रात असून, सदर जलवाहतूक रो-रो जेट्टी कुंडलिका नदीच्या दक्षिणेस व रेवदंडा-साळाव पुलाच्या पश्चिमेस बांधण्यात येत आहे. या जेट्टीस स्थानिक कोळी बांधवांचा विरोध असून, तसे पत्र महाराष्ट्र सागरी मंडळास दर्यातरंग सागरी मच्छिमार वि.का.स.संस्था मर्यादित रेवदंडा-चौल यांनी दिले आहे. शिवाय, या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी रायगड, पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी अलिबाग, तहसीलदार अलिबाग, प्रादेशिक बंदर अधिकारी, रेवदंडा सागरी मंडळ बंदर अधिकारी यांना दिले आहे.

सदर जलवाहतूक रो-रो जेट्टी बांधल्याने स्थानिक मच्छिमारांचे मच्छी उतरविणे, जाळी उतरविणे, तसेच जेट्टीच्या समोरील जाळी बांधण्याचे ठिकाण कायमस्वरूपी नष्ट होणार आहे, तसेच रेवदंडा-कोर्लईच्या चॅनेलमधून रो.रो. नौका येताना व जाताना, मच्छिमाऱ्यांच्या जाळीचे नुकसार होणार आहे. या समस्येचा विचार करून संबंधित खात्याचे अधिकारी, ठेकेदार व संस्थेची संयुक्त सभा घेण्यात यावी. शिवाय, स्थानिक मच्छिमार बांधवांना प्रकल्पग्रस्त म्हणून घोषित करण्यात यावे व शासनाने होणारी नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी या निवेदनपत्रामध्ये दर्यातरंग सागरी मच्छिमार वि.का.स.संस्था मर्यादित रेवदंडा-चौल यांच्यावतीने करण्यात आली आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्ता, ग्रीन बिल्डिंगवर सेमिनार

| पनवेल | प्रतिनिधी |

क्रेडाई एमसीएचआय रायगड युनिटने मॅरियट एक्झिक्युटिव्ह अपार्टमेंट्स नवी मुंबई येथे ''रिअल इस्टेटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ग्रीन बिल्डिंग'' या विषयावर एक माहितीपूर्ण सेमिनार आयोजित केला होता. या कार्यक्रमाला नवी मुंबई आणि रायगड विभागातील सुमारे ७५ बांधकाम व्यावसायिक आणि डेव्हलपर्सनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. तसेच या क्षेत्रातील विविध बांधकाम व्यावसायिक संघटनांचे पदाधिकारीही उपस्थित होते.

या सेमिनारमध्ये केसरी इन्फ्राबिल्ड एलएलपीचे संचालक के. श्रीनिवासन यांनी ग्रीन बिल्डिंगवर सखोल सादरीकरण करत ग्रीन बिल्डिंग संकल्पना स्वीकारण्याचे महत्त्व सांगितले आणि ती लागू




केल्याने बांधकाम व्यावसायिकांना होणाऱ्या विविध फायद्यांवर प्रकाश टाकला. तर कायझेन एआयचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जय शाह यांनी रिअल इस्टेटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भूमिकेबद्दल मौल्यवान माहिती देत प्लॅनिंग नियमांचे उल्लंघन न करता अतिरिक्त बिल्ट-अप एरिया तयार करण्यासाठी मोकळ्या जागांचा वापर ऑप्टिमाइझ करण्याच्या अभिनव पद्धती समजावून सांगितल्या. दोन्ही वक्त्यांनी आपापल्या विषयांवर अत्यंत माहितीपूर्ण आणि दूरदृष्टीकोन असलेले विचार मांडले. यावेळी सहभागींनी प्रश्नोत्तरांच्या सत्रात सक्रिय सहभाग घेतला आणि वक्त्यांनी सर्व प्रश्नांची सर्वसमावेशक उत्तरे दिली. पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये आणि क्रेडाई एमसीएचआयचे सीओओ केवल वळंभिया या सेमिनारला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये यांनी आपल्या भाषणात सदस्यांना पनवेल महानगरपालिकेच्या महत्त्वाकांक्षी आणि आक्रमक वृक्षारोपण मोहिमेबद्दल माहिती दिली, ज्यामध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रात १ लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तर, क्रेडाई एमसीएचआय रायगडचे अध्यक्ष अरविंद सावळेकर यांनी बांधकाम व्यावसायिक आणि डेव्हलपर्सच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल स्वागत केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी उपाध्यक्ष हितेंद्र घाडिया, समिती सदस्य प्रतीक पोटे, आशियान खोत, जितेश अग्रवाल, अनिरुद्ध सावळकर आदींनी मेहनत घेतली.

# घरफोडी करणारे गजाआड

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल व आजूबाजूचे परिसरात विविध ठिकाणी घरफोडी चोरी करणाऱ्या दुकलीला पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले असून, त्यांच्याकडून चोरीचा माल हस्तगत केला आहे.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत भिंगारवाडी येथील बिअर शॉप मध्ये चोरीची घटना घडली होती. या गुन्ह्याची नोंद होताच पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ ३, पनवेल प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंदा कांबळे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सहा. पोलीस निरीक्षक अनुरुध्द गिजे, पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपुत, पोहवा विजय देवरे, पोहवा महेश धुमाळ, पोहवा सुनील कुदळे, पोहवा सतिष तांडेल, पोहवा शिवाजी बाबर, पोहवा भूषण म्हारसे, पोशि आकाश भगत, पोशि भिमराव खताळ आदींच्या पथकाने गोपनिय माहिती प्राप्त करुन तसेच तांत्रिक तपासाद्वारे आरोपी नामे सुदाम भगवान वाघे (२६) व विधीसंघर्षग्रस्त बालक यांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न करुन त्यांना पनवेल परिसरातून अटक करण्यात आली आहे.

आरोपीकडे करण्यात आलेल्या तपासादरम्यान त्याच्याकडून दोन मोबाईल, एक मोबाईल चार्जर, गुन्हयामध्ये वापरलेली मोटारसायकल, गुन्हा करतांना सीसीटीव्ही फूटेजमध्ये दिसत असलेले त्यांचे अंगावरील कपडे व २९ हजार रोख रक्कम असा एकूण ६५ हजार तीनशे रुपये किमतीचा माल हस्तगत केला आहे.

# कंपनीच्या अधिकाऱ्याला साडेदहा लाखांचा गंडा

| पनवेल | प्रतिनिधी |

अज्ञात सायबर चोरट्यांनी कामोठे येथे राहणाऱ्या एका प्रतिष्ठित कंपनीच्या वरिष्ठ कार्यकारी अधिकाऱ्याला तब्बल १० लाख ६८ हजार रुपयांना गंडा घातल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली.

प्रवीण नरवडे (३७) असे या अधिकाऱ्याचे नाव आहे. प्रवीण नरवडे हे मुंबईतील एका प्रतिष्ठित कंपनीच्या वरिष्ठ कार्यकारी अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. नरवडे यांच्या खात्यातून कोणतेही व्यवहार होत नसल्याचे लक्षात आल्याने त्यांनी तातडीने कामोठे येथील आपल्या बँकेत धाव घेतली. बँक अधिकाऱ्यांनी त्यांच्या सिस्टीममध्ये तपासणी केली असता, त्यांच्या खात्यातून ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या काळयात तब्बल २३ व्यवहार झाल्याने त्यांचे खाते ब्लॉक झाल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर नरवडे यांनी बँकेकडून त्यांना मिळालेल्या बँक स्टेटमेंटची तपासणी केली असता, सायबर चोरट्यांनी प्रथम नरवडे यांच्या खात्यातून त्यांच्या परवानगीशिवाय ५ लाख ११ हजार आणि पुन्हा ५ लाख ४ हजार ४७९ रुपये असे दोन वेळा इंस्टा जम्बो लोन काढले. त्यानंतर त्याच दिवशी एकूण १० लाख १५ हजार ४७९ रुपयांच्या रकमेचे फिक्स्ड डिपॉझिट (एफडी) मध्ये रूपांतरित केले. त्यानंतर सायबर चोरट्यांनी १ नोव्हेंबर रोजी ही एफडी तात्काळ मोडून टाकली.

# आदिवासींना शेती अवजारे वाटप

## ओएनजीसीची सीएसआर फंडातून मदत

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण रानसई येथील सहा आदिवासी वाड्यातील ४३० कुटुंबियांना शेतीच्या कामासाठी लागणारी अवजारे आणि पाच मच्छिमार आदिवासींना ओएनजीसीकडून विनायांत्रिकी बोटीचे वाटप करण्यात आले आहे.

रानसई ग्रामपंचायत ही शंभर टक्के आदिवासी बांधवांची लोकवस्ती असणारी ग्रामपंचायत आहे. या ठिकाणी खैरकाठी, मार्गाची वाडी, बंगल्याची वाडी, खोंड्याची वाडी, सागवाडी आणि भुऱ्याची वाडी, अशा सहा आदिवासी वाड्या असून, ४३० आदिवासी कुटुंबे वास्तव्यास आहेत. शेतमजुरी, भाजीपाला आणि मासेमारी करून हे आदिवासी उपजीविका करतात. त्यांना फावडा, कुदळ, पहार, घमेल,



लोखंडी पंजा अशी शेतीची अवजारे आणि पाच विनायांत्रिकी बोटींचे वाटप ओएनजीसीने सीएसआर फंडातून केले आहे. याप्रसंगी उरण ओएनजीसी प्रकल्पाच्या अधिकारी भावना आठवले, संजीव मोहन, गौरव पतंगे, अभिषेक पाटील यांच्यासह साद फाऊंडेशनचे प्रतिनिधी उपस्थित होते. रानसईतील बहुतांशी आदिवासी कुटुंबे हे भाजपाला, मोलमजुरी आणि मासेमारी व्यवसाय करून उपजीविका करतात. रोजच्या वापरातील वस्तू मिळाल्यामुळे आदिवासी बांधवांनी समाधान व्यक्त केले.

# बेकायदा डेब्रिज टाकणाऱ्यांवर कारवाई

| पनवेल | प्रतिनिधी |

सिडकोने संपादित केलेल्या जमिनींवर तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूखंडावर बेकायदा डेब्रिज टाकणाऱ्या डंपरबरोबर त्यांच्या चालकांना रंगेहाथ पकडून या प्रकारांना आळा घालण्यासाठी सिडको प्रशासनाने कंबर कसली आहे. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने नवी मुंबई परिसरात कारवाईची मोहीम तीव्र हाती केली आहे. धाकटा खांदा, कामोठे येथील काळसेकर कॉलेजच्या बाजूला उघड्यावर डेब्रिज टाकणाऱ्या दोन डंपर्सवर पथकाने कारवाई करून ते जप्त केले. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात डम्पर चालकांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**'लास्ट स्टॉप खांदा' चित्रपटात जुईली टेमकरची भूमिका** | **२१ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार**

# अलिबागच्या कन्येचे चंदेरी दुनियेत पाऊल

| अलिबाग | प्रतिनिधी |

हास्यजत्रा फेमस श्रमेश बेटकर आणि जुईली टेमकर यांच्या प्रमुख भूमिका असलेला मराठी चित्रपट 'लास्ट स्टॉप खांदा' महाराष्ट्रात एकूण ७५ चित्रपटगृहात २१ नोव्हेंबरला धूमधडाक्यात प्रदर्शित होणार आहे.

निर्मिती शिवम फिल्म क्रिएशन, सिग्नेचर ट्युन्स आणि स्नेहा प्रॉडक्शन्स यांची असून, निर्माते प्रदीप जाधव, सहनिर्माते सचिन कदम, अमृता जाधव आहेत. चित्रपटाचे लेखन श्रमेश बेटकर यांनी केले आहे, तर दिग्दर्शन विनित परुळेकर यांचे




**''शालू झोका दे गो मैना'' हे चित्रपटाचे गाणे अतिशय लोकप्रिय झाले आहे. या चित्रपटात मनोरंजक प्रेमाची गोष्ट असून, अतिशय चढ-उतार असलेले कथानक प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. तरी, प्रेक्षकांनी आपल्या जवळच्या चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहावा, असे कलाकारांनी आवाहन केले आहे.**

आहे. सचिन कदम आणि सचिन जाधव यांची प्रस्तुती आहे.

या चित्रपटात हास्यजत्रा फेम अभिनेता श्रमेश बेटकर, अभिनेत्री जुईली टेमकर, निखिल बने, मंदार मांडवकर, शशिकांत केरकर, सुदेश जाधव, महेश कापरेकर, प्रियांका हांडे, डॉ. सचिन वामनराव, गणेश गुरव, निशांत जाधव, गिरीश तेंडुलकर, जयश्री गोविंद या कलाकारांच्या भूमिका आहेत. या चित्रपटात प्रभाकर मोरे, धनश्री काडगावकर आणि अशोक ढगे प्रमुख पाहुणे कलाकार आपल्या भेटीस येणार आहेत. चित्रपटाचे छायांकन हरेश सावंत, कला दिग्दर्शन केशव ठाकूर, संगीत श्रेयस राज आंगणे, तर नृत्यदिग्दर्शन राहुल बनसोडे, रवी आखाडे यांनी केले.

# कामोठे कॉलनी फोरमचा निर्धार मेळावा

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कामोठे कॉलनी फोरमतर्फे आयोजित निर्धार मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कामोठे शहरातील दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या नागरी समस्या सोडवण्यासाठी आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी स्वच्छ, प्रामाणिक आणि जबाबदार पर्याय निर्माण करण्याचा संकल्प या मेळाव्यात करण्यात आला.

कामोठे शहरातील पाणीटंचाई, वीज अडचणी, खड्डेमय रस्ते, आरोग्य सुविधा, अग्निशमन केंद्र, मलनिस्सारण व्यवस्था, सार्वजनिक वाहतूक यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर कॉलनी फोरमने अनेक वर्षांपासून सातत्याने लढा दिला आहे. या प्रश्नांकडे सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष




केल्यामुळे नागरिकांमध्ये प्रस्थापित राजकारणाबद्दल नाराजी निर्माण झाली असून, आता लोक विकासाभिमुख नव्या पर्यायाची अपेक्षा करत आहेत.

मेळाव्यात मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून सुशिक्षित, प्रामाणिक आणि तत्परतेने काम करणाऱ्या उमेदवारांची निवड करण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाचे आयोजन कॉलनी फोरमच्या अध्यक्षा लीना गरड यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच कामोठे कॉलनी फोरम अध्यक्ष मंगेश अढाव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. व्यासपीठावर खारघर कॉलनी फोरमचे मुख्य समन्वयक मधू पाटील, महिला अध्यक्षा जयश्री झा, ॲड. समाधान काशीद, जयवंत खरात, प्रवीण भालतडक, गीता कुडाळकर, शुभांगी जाधव, उषाकिरण शिंगे, मुक्ता घुगे, शीतल दिनकर आणि सुप्रिया माने यांची उपस्थिती होती.

# एक स्फोट, काही रहस्ये

दिल्लीमध्ये लाल किल्ला परिसरातील स्फोटाला आता एक आठवडा झाला आहे. मधल्या काळात बिहार निवडणुकांचे निकाल आल्याने काही काळ देशाचे लक्ष तिकडे होते. पण या स्फोटामुळे निर्माण झालेले प्रश्न वाढत चालले आहेत. त्यामागची रहस्ये अधिक गूढ होत चालली आहेत. या स्फोटामागे मूळच्या काश्मीरच्या असलेल्या काही डॉक्टरांच्या टोळीचा हात असल्याचे स्पष्ट झाले आहे. डॉक्टर उमर नबी हाच ती संबंधित मोटार कार चालवत होता व तिच्यातच हा स्फोट झाल्याचे नक्की झाले आहे. आरंभी हा प्रकार म्हणजे जाणीवपूर्वक नव्हे तर घाईघाईने घडवलेला घातपात किंवा अपघात असावा असा तर्क करण्यात आला होता. पण त्यातूनच अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. नबी व त्याचे साथीदार मुझम्मिल गनाई हे दोघेही फरिदाबादच्या अल फलाह इस्पितळात डॉक्टर म्हणून काम करीत होते. गनाई यांना ३० ऑक्टोबरलाच पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यांच्याकडून सुमारे २९०० किलो स्फोटके जप्त करण्यात आली होती. ही स्फोटके म्हणजे खतांसाठी वापरले जाणारे अमोनियम नायट्रेट व पोटॅश होते. गनाई गेल्या तीन वर्षांपासून या खतांची खरेदी करून फरिदाबादजवळच्या एका खोलीत ठेवत होते. या काळात पोलिसांना याचा सुगावा कसा लागला नाही ही मोठी आश्चर्याची बाब आहे. कारण, खतांच्या विक्रीवर बरेच निर्बंध आहेत आणि फरिदाबाद ज्या राज्यात येते त्या हरियाणात भाजपचेच सरकार आहे. मुझम्मिल यांना अटक झाली तेव्हा नबी बाहेर होता व अटकेची बातमी येताच तो पसार झाला. इतका मोठा स्फोटकांचा साठा जप्त केल्यानंतर पोलिसांनी खरे तर वेगाने कारवाई करायला हवी होती. मुझम्मिल व नबी याचे संबंध सर्वांना ठाऊक होते. शिवाय मुझम्मिल पोलिसांच्या ताब्यात होता. त्या स्थितीत नबीला ताब्यात घेण्याला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक होते. पोलिसांकडे त्याचा फोटो व इतर माहिती होती. ती दिल्लीसह सर्व पोलिसांकडे पाठवली गेली असती व कदाचित स्फोट टळला असता.

### नबी सुटला कसा

प्रत्यक्षात तीस ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या अकरा दिवसांच्या काळात नबी मोकळा राहिला. त्याचा कोणताही ठावठिकाणा पोलिसांना कळू शकला नाही किंवा तो शोधण्याचा गंभीरपणे प्रयत्न झाला नाही. इतकेच नाही तर नबी १० नोव्हेंबरला आरामात दिल्लीत प्रवेश करू शकला. सकाळपासून दुपारपर्यंत त्याने वेळ काढला. मधल्या काळात गाडीची प्रदूषण नियंत्रण चाचणीही केली व संध्याकाळच्या सुमारास त्याने स्फोट केला. आधी असे म्हटले जात होते की, पोलिस मागावर असल्याने तो घाबरला होता. पण आता असे दिसते की, स्फोट घडवण्यापूर्वी तो एका पार्किंग लॉटमध्ये तीन तास थांबून होता व तिथेच त्याने बाँबची जुळवाजुळव केली. वास्तविक अकरा दिवसांमध्ये तसेच दिल्लीतील पाच-सहा तासांमध्ये तो मोबाईलवरून कोणाशी तरी संपर्कात असलाच पाहिजे. पोलिस जर त्याच्या मागावर असते तर त्यांनी हे संभाषण कोणत्या ना कोणत्या मार्गाने पकडायला हवे होते. त्यामुळे पोलिस गाफील राहिला की उमर नबी त्यांच्यापेक्षा चलाख ठरला असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. स्फोटकांचा मोठा साठा जप्त केल्यामुळे पोलिस बहुदा निर्धास्त झाले व आता आपण दुर्घटना टाळली असा त्यांचा समज झाला व तिथेच घात झाला. नरेंद्र मोदी सत्तेत आल्यापासून देशात असे स्फोट झालेले नाहीत व अतिरेक्यांची तसे करण्याची हिंमत नाही असे मोदी व शाह सतत सांगत असतात. पोलिसही या प्रचाराला बळी पडून बेफिकीर झाले आहेत की काय हे या निमित्ताने तपासायला हवे. दरम्यान मुळात या प्रकरणामध्ये जम्मू काश्मीर पोलिसांनी कारवाई केलेली आहे. तिथे जैशे महंमदला पाठिंबा देणारी पोस्टर लागल्याच्या कारणावरून मुळात हा सर्व तपास सुरू झाला व एकेक कडी उलगडत गेली. आधी काश्मिरातील एका मशिदीच्या इमामाला पकडण्यात आले व त्याने दिलेल्या माहितीच्या आधारेच पोलिस या डॉक्टरांपर्यंत पोचले. याबद्दल पोलिसांचे कौतुक करायला हवे. पण नंतर त्यांनी पुरेशी दक्षता दाखवली नाही की काय याचीही चौकशी व्हायला हवी.

### स्फोटके नाहीशी झाली

दरम्यान, काश्मीर पोलिसांनी मुझम्मिलने जमा केलेली तीन हजार किलो स्फोटके पुढील तपासासाठी फरिदाबादहून श्रीनगरच्या नौगाव पोलिस ठाण्यात नेली होती. शुक्रवारी तिथे भीषण स्फोट होऊन ९ जणांचा मृत्यू झाला. पोलिस ठाणे जवळपास नष्ट झाले. त्यात पोलिसांचे लेखी व इतर पुरावे, नोंदी तसेच खुद्द स्फोटके नष्ट झाली. साहजिकच हा घातपाताचा काही प्रकार असावा असा संशय निर्माण झाला. तूर्तास काश्मीर पोलिसांनी हा अपघातच होता असे तात्काळ व निःसंदिग्धपणे सांगितले असले तरी त्यातून बरेच गूढ प्रश्न निर्माण झाले आहेत. मुळात स्फोटके जप्त केली गेली होती हरियाणातील फरिदाबादमध्ये. तिथून ती ८०० किलोमीटर अंतरावरच्या श्रीनगरमध्ये नेण्याची काय गरज होती, ती फरिदाबादमध्येच का ठेवली गेली नाहीत असा प्रश्न सुरक्षा जाणकारांनी उपस्थित केला आहे. या स्फोटकांची जी काय तपासणी करायची होती ती फरिदाबादमध्येही होऊ शकली असती. दुसरे म्हणजे अमोनियम नायट्रेट नुसते पोत्यात भरून ठेवलेले असले तर त्याचा आपोआप स्फोट होत नाही. त्याला बाहेरून काहीतरी ट्रिगर लागतो. फटाके नुसते असले तर पेटत नसतात. त्यांची वात पेटवावी लागते. तसाच हा प्रकार आहे. याचाच अर्थ पोलिस ठाण्यातील हाताळणीच्या वेळी काहीतरी घोटाळा झालेला आहे. काश्मीरमध्ये अशा प्रकारची स्फोटके कित्येक वर्षांपासून आढळत आहेत. ती कशी हाताळायची याचे चांगले ज्ञान व अनुभव पोलिसांना आहे. तरीही या स्फोटकांचा असा स्फोट व्हावा हे संशयास्पद वाटण्याजोगे आहे. त्याचा नीट तपास होईल व सत्य काय ते सरकार लवकर जनतेसमोर मांडेल अशी आशा आहे. यापूर्वी पहलगाममध्ये हल्ला झाला तेव्हा अतिरेकी आले कुठून असा प्रश्न निर्माण झाला होता. नंतर अतिरेकी मारले जाईपर्यंत चार महिने जंगलात जिवंत कसे राहिले याचेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यावेळी अतिरेक्यांच्या मागावर असलेल्या जवानांना ड्रोनने जेवण पुरवावे लागत होते असे खुद्द अमित शाह यांनी सांगितले होते. तर मग अतिरेकी खाण्यापिण्याचे काय करीत होते हे गूढ होते व आजतागायत कायम आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर आता दहशतवादी घटना घडणार नाहीत असे सांगितले जात होते. पण काश्मिरात नव्हे तर खुद्द दिल्लीतच अशी घटना घडली व सरकारला त्याबाबत सुगावा लागूनही ती रोखता आली नाही. शिवाय याबाबतचा महत्वाचा पुरावा असलेली स्फोटके आता जळून खाक झाली आहेत. मोदी सरकारने नेहमीप्रमाणे हेही तपशील दडपण्याचा प्रयत्न केला तर त्याच्याविषयीचा संशय आणखीनच वाढणार आहे.

विचार

# थातूरमातूर उपायांमुळे वाढली समस्या

**_राज्यात जुन्नर, नाशिक, नगर तसेच इतर काही जिल्ह्यांमध्ये गेल्या २५ वर्षांपासून सातत्याने वाढ होत असलेल्या बिबट्यांच्या समस्येवरील उपाययोजनांमधील थातूरमातूरपणा आणि गांभीर्याच्या अभावामुळे सामान्यांचे जगणे संकटग्रस्त झाले आहे. हे बिबटे मुळात शेतीतलेच असल्याने समस्येची जटीलता वाढली आहे. म्हणूनच वन विभागाने या गंभीर प्रश्नावर उपाययोजना करताना ते मानवकेंद्रित राहतील, अशी काळजी घेणे आवश्यक आहे._**

**मिलिंद बेंडाळे**

राज्यात विशेषत: शेतीच्या क्षेत्रात गेल्या २५ वर्षांपासून बिबटे व मानवाचा संघर्ष सुरू आहे. त्यातल्या त्यात पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या जिल्ह्यांमधील बागायती तसेच उसाचे क्षेत्र असलेल्या जिल्ह्यात ही समस्या गंभीर बनली असून सातत्याने वाढत आहे. नुकतेच जुन्नर विभागात बिबट्याच्या हल्ल्यात सलग चार बळी गेल्याने जनक्षोभ उसळला. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या वन विभागाच्या शूटर्सनी एका संशयित नरभक्षक बिबट्याला ठार केले. तसे पाहिले तर, फक्त बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये राज्यात आतापर्यंत सुमारे १२० जणांचा बळी गेला आहे. फक्त जुन्नर वन विभागात २०२० ते २०२५ दरम्यान बिबट्यांच्या हल्ल्यात सुमारे २४ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात याच काळात ही संख्या शंभरहून अधिक आहे. यावरून या समस्येच्या तीव्रतेत वाढच होत असल्याचे स्पष्ट होते. अनेक उपाययोजना करूनही हे प्रमाण कमी न होण्याचा अर्थ सरकारला आपल्या उपाययोजनांमध्ये क्रांतीकारी बदल करावे लागणार, हे स्पष्ट आहे. या समस्येवर उपाय म्हणून सरकारने आता जुन्नर विभागातील बिबट्यांची नसबंदी करण्याचे ठरवले आहे. हा उपाय म्हणजे 'जखम पायाला अन औषध शेंडीला' असा प्रकार आहे. वन्यजीव व्यवस्थापनात जगात अद्याप कुठेही न घडलेला असा हा प्रकार आहे. बिबट्याच्या हल्ल्यात लहान मुलांचा सलग बळी गेल्याने अलिकडे जुन्नर परिसराबरोरच राज्यभर खळबळ उडाली. अर्थातच, या समस्येचे खापर वन विभागावर फोडले जात आहे.

खरे तर, लहान मूल बिबट्याच्या हल्ल्यात बळी पडते, तेव्हा कुटुंबावर मोठा मानसिक आणि भावनिक आघात होतो. वन विभागाने अशा ठिकाणी तातडीने भेट देऊन कुटुंबाच्या सांत्वनाबरोबरच तातडीने आर्थिक भरपाई देण्याचे धोरण आखले. भरपाईची ही रक्कमही आता २५ लाख रुपये आहे. पण, त्यामुळे त्या कुटुंबाची हानी कशी भरून येणार या प्रश्नाचे उत्तर वन विभागाकडे नाही. तत्काळ उपाययोजनेचा भाग म्हणून अशा घटना घडलेल्या भागात पिंजरा लावून तेथील बिबटे पकडून दूर सोडण्याचेही वन विभागाचे धोरण आहे. पण, बिबट्यांची संख्या जास्त असते, तेथे एक बिबट्या उचलला, की त्याची जागा दुसरा बिबट्या घेत असतो. शिवाय दुसरीकडे सोडलेल्या बिबट्याने नवीन भागात गेल्यावर भांबावून जाऊन तेथे त्रास दिल्याची काही उदाहरणे आहेत. त्यामुळे असे करणे म्हणजे फक्त समस्येचे स्थलांतर असल्याचा काही वन्य जीव अभ्यासकांचा आक्षेप असल्याने हा उपाय थांबवण्यात आला. कारण पकडलेला बिबट्या सोडायचा नाही, म्हटल्यावर पोषणाचा खर्च कोणी करायचा, हा ही प्रश्न निर्माण झाला.

**उपाय मानवकेंद्रित हवेत**

शेतीक्षेत्रातील बिबट्यांच्या समस्येवर उपाययोजना करताना त्या 'मानवकेंद्रित' नसल्याचा हा पुरावा आहे. कारण पकडल्या गेलेल्या बिबट्याच्या पुनर्वसनाचा प्रश्न विचारात घेतला गेला. मुळात बिबट्यांची तीव्र समस्या असलेल्या जुन्नर, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील भाग प्रादेशिक वन विभागाच्या अंतर्गत येतात. येथे चालणाऱ्या कामांशी बिबट्याच्या व्यवस्थापनाचा काहीही संबंध नाही. त्यामुळे बिबट्यांच्या समस्येवर उपाययोजना करताना प्रशिक्षित मनुष्यबळ आणि साधनांचा प्रचंड तुटवडा आहे. तात्पुरता उपाय म्हणून बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावायचा म्हटला, तरी त्यात बिबट्याला आमिष म्हणून कुत्रा किंवा शेळी ठेवली जायची. तिचा बळी जायचा. त्यावेळी पर्यावरण चळवळीतील कार्यकर्त्या आणि माजी केंद्रीय मंत्री मनेका गांधी यांनी पिंजऱ्यात आमिष म्हणून ठेवलेल्या प्राण्यावर हा एक प्रकारे अन्याय असल्याचा आक्षेप घेतला. त्यामुळे पुन्हा पिंजऱ्यात आमिषासाठी स्वतंत्र कप्पा तयार करावा लागला. शिवाय एकदा पिंजऱ्यात अडकल्यानंतर बिबट्या व तो प्राणी यांच्यात भक्कम भिंतवजा पडदाही तयार करावा लागला. अशा अनेक समस्या आहेत. अर्थातच, अशा अडथळ्यांमुळे या समस्येचे कधीच पूर्ण निराकरण झाले नाही. उलट, धोरणलकवा आणि उपाययोजनांच्या अंमलबजावणीमध्ये आलेल्या शिथीलतेमुळे या समस्येची तीव्रता पुन्हा वाढली. त्यातूनच आता या भागातील बिबट्यांच्या नसबंदीचा नवीन उपाय काहींनी शोधला आहे. अर्थात नसबंदीमुळे काही बिबट्यांच्या पुढील पिढीच्या निर्मितीला पायबंद बसेल, पण हेच बिबटे पुन्हा त्याच भागात सोडल्यावर समस्या निर्माण करणार नाहीत, याची खात्री कोण देणार? या शिवाय सर्व बिबट्यांची सरसकट नसबंदी शक्य होईल का, याबाबतही शंका उपस्थित होत आहेत.

**काही प्रश्न अनुत्तरित**

ठराविक भागातच बिबट्यांची संख्या का वाढते, याचा अभ्यास झाला आहे. त्यानुसार उसामुळे मिळणारे लपण, जवळच असलेल्या गावातील भटकी कुत्री, पाळीव डुकरे, मांजरे यांच्या रूपाने सहज उपलब्ध होणारे खाद्य आणि पाणी यामुळे बिबटे अशा भागांमध्ये स्थिरावून वेगाने वाढत असल्याचे स्पष्ट झाले. जंगलांमधील अन्न कमी झाल्याने हे बिबटे जवळच्या जंगलांमधून बाहेर आल्याचा सिद्धांत चुकीचा आहे. शेतीच्या भागातील बिबटे तसे मुळचे तेथीलच आहेत. फक्त उसाचे क्षेत्र वाढल्यानंतर त्यांची संख्या झपाट्याने वाढल्याचे या संदर्भातील अभ्यासात स्पष्ट झाले आहे. त्यातच बिबट्या हा तसा संधिसाधू आणि अत्यंत प्रतिकुल परिस्थितीशी जुळवून घेणारा प्राणी आहे. वेळप्रसंगी तो अगदी सरडा किंवा बेडूकही खाऊन जगू शकतो. जंगलात बिबट्याच्या पिल्लांना अनेक नैसर्गिक शत्रू असतात, त्यामुळे त्यांची संख्या मर्यादित राहते. शेतीक्षेत्रात बिबट्यांच्या पिल्लांना नैसर्गिक शत्रू नसणे, हे त्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ होण्यामागील एक महत्त्वाचे कारण आहे. जुन्नर विभागातील बिबट्यांची संख्या बेसुमार वाढल्याने त्यातील काही बिबट्यांनी जुन्नर तालुक्याला लागून असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर सारख्या दुष्काळी तालुक्यात स्थलांतर केले आहे. विशेष म्हणजे, या भागातही ते स्थिरावले आहेत. त्यामुळे भविष्यात या भागातही बिबट्यांची तीव्र समस्या निर्माण झाल्यास आश्चर्य वाटू नये. दुसरा प्रश्न म्हणजे, लपण, भटक्या कुत्र्यांच्या रूपाने सहज उपलब्ध होणारे भक्ष्य ही स्थिती देशभरातल्या बागायती शेतीच्या क्षेत्रात आहे. मग, महाराष्ट्राच्या काही भागातच बिबट्यांची संख्या का वाढत आहे, या प्रश्नाचा वस्तुनिष्ठ अभ्यास झालेला नाही. समस्येच्या कारणांच्या सर्व पैलूंची माहिती असल्याशिवाय उपाययोजनांना काहीही अर्थ नाही.

**निवारा केंद्रांचे अर्थकारण**

पिंजऱ्यातील शेळी किंवा कुत्र्यावरील भावनिक अत्याचारांचा विचार करणाऱ्या स्वयंसेवी संस्था ज्यांच्या घरातील एकुलतं एक मुल बिबट्याच्या हल्ल्यात बळी जाते, त्यांच्याबाबत एकही अक्षर उच्चारताना दिसत नाहीत. प्राण्यांच्या हक्कांबद्दल उच्चरवाने बोलणाऱ्या काही स्वयंसेवी संस्थांचे आर्थिक हितसंबंध आता उघड झाले आहेत. वनविभागाने बिबट्यांसाठी माणिकडोह येथे बिबट्या निवारण केंद्र उभे केले. येथे ८० बिबटे आहेत. त्याच्या उभारणीसाठीचा सर्व खर्च वन विभागाने केला. वन विभागाने काही वर्षे व्यवस्थित चालवल्यानंतर हे केंद्र दिल्लीच्या 'वाईल्डलाईफ एसओएस' या स्वयंसेवी संस्थेला चालवण्यास देण्यात आले. त्यासाठी संबंधित संस्थेने वन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरले. या केंद्राला भेट देण्यासाठी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनाही परवानगी घ्यावी लागते, या वरून या संस्थांची कार्यपद्धती स्पष्ट होते. आताही शिरूरजवळ सुमारे दोनशे बिबट्यांसाठी निवारा केंद्र उभारणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केले आहे. उभारणीनंतर ते चालवण्यासाठी पुन्हा स्वयंसेवी संस्थेस दिले जाईल. म्हणजे केंद्र उभारणार सरकार आणि ते चालवणार स्वयंसेवी संस्था, असा खेळ आहे. कारण या केंद्राच्या नावाने या संस्थाना मोठ्या प्रमाणात परदेशांतून निधी उपलब्ध होत असतो. त्यामुळे अशी केंद्रे उभारताना ती बिबट्यांच्या सोयीसाठी आहेत की स्वयंसेवी संस्थांचे हितसंबंध जोपासण्यासाठी, हा प्रश्न यातून निर्माण झाला आहे.

**उपाययोजनांमध्ये कठोरपणा हवा**

बिबट्याही वन्य जीव अधिनियम सूची क्रमांक एकमधील प्राणी आहे. ही सूची देशातील सर्वाधिक संकटग्रस्त प्राण्यांची आहे. त्यामुळे उपाययोजना करताना वनविभागाला अनेक मर्यादा येतात. वास्तविक पाहता, आपल्या देशापेक्षा आफ्रिकेत विपूल वन्यजीवन आहे. तेथेही एखाद्या वन्यजीवाची संख्या बेसुमार वाढून समस्या निर्माण होते. त्यावेळी सर्वतोपरी विचार करून अत्यंत कठोरपणे उपाययोजना केल्या जातात. आफ्रिकेतील झिंबाब्वेसारख्या देशातील जंगलांमध्ये हत्तींची संख्या बेसुमार वाढली, तेव्हा संख्या कमी करण्यासाठी त्यांना ठार करण्यात आले. दक्षिण आफ्रिकेतही असा उपाय करण्याबाबत विचार सुरू आहे. आपल्याकडील वन्यजीव कायदा अतिशय कडक आहे. (तरीही चोरट्या शिकारीचे प्रमाण जगात अधिक आहे.) त्यामुळे काही उपाययोजना करताना या कायद्याचा मोठा अडथळा निर्माण होतो. बिबट्याच्या भीतीने त्यांचा संचार असलेल्या भागात रात्री अक्षरश: संचारबंदीचे वातावरण आहे. रात्री तर सोडाच, दिवसाही शेतीची कामे करायला शेतकरी घाबरत आहेत. त्यामुळे शेतीच्या उत्पादनावर त्याचा विपरित परिणाम होण्याची भीती आहे. मुळात शेतीच्या क्षेत्रातील बिबट्यांचे अस्तित्व शेतकऱ्यांच्या दृष्टीने संकट मानले गेले पाहिजे. त्या दृष्टीनेच सर्व उपाययोजना करताना वन विभागाने कोणाचाही विचार न करता कठोर होणे आवश्यक आहे. यात वेळप्रसंगी बिबट्यांना शेतीक्षेत्रातून पूर्णपणे बाहेर काढण्याचा विचार होणे आवश्यक आहे. अर्थात तेही वारंवार करावे लागणार आहे. कारण बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव प्राणी ठार झाला, तर नुकसानभरपाई देऊन क्षोभ कमी करता येईल, पण सध्याच्या मर्यादित कुटुंबाच्या काळात बिबट्याच्या हल्ल्यात मानवी बळी गेल्यास हे नुकसान कधीही न भरून येणारे असते, हे लक्षात घेतले पाहिजे.

**(लेखक निसर्ग आणि प्राणीजीवनाचे अभ्यासक असून जंगलांमध्ये अनेक प्रकारचे संशोधन करतात.)**

# भारतीय संघाने लाज घालवली!

**राकेश लोहार**

इडन गार्डन्सवर रविवारी भारतीय संघाने भारताची अक्षरशः लाज घालवली. खेळ आहे, खेळात हार-जीत होते, हे मान्य! परंतु, आपण काही नवखे खेळाडू तर नाहीच ना! संपूर्ण भारताचे प्रतिनिधित्व करीत असताना तुमच्या खेळात तेवढी परिपक्वता असायलाच हवी! तुम्ही जिंकलात की जितके तुम्हाला डोक्यावर घेतले जाते, त्यामुळे आजच्या पराभवामुळे तुमची छी-थू होईल, हे खेळाडूंना सांगणे आहे. विजयासाठी १२४ धावांचे माफक लक्ष्य असताना भारतीय फलंदाजांनी स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारली आणि सामना गमावला, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आजचा हा लाजिरवाणा पराभव मायभूमीवरचा दारुण पराभवाचा चौकार ठरला. गेल्या वर्षी न्यूझीलंडने तीन सामन्यांत झुकवले होते आणि आता दक्षिण आफ्रिकन संघासमोर भारतीय संघाने नांगी टाकली. अरे, गल्लीतील पोरंसुद्धा चांगली खेळली असती, असे म्हणण्याची वेळ आली आहे. एका पराभवाने सर्वकाही संपत नसते, हे बोलायला ठीक आहे. परंतु, जिंकलेला सामना जेव्हा गमावला जातो, तेव्हा खेळाचे धिंडवडे निघणारच! तेच आज भारतीय संघाने, संघातील खेळाडूंनी केले आहे. यजमानांनी पाहुण्यांसाठी फिरकीचे जाळे टाकले खरे; पण त्यामध्ये भारतीय खेळाडूच जास्त अटकत गेले. पाहुण्यांची खेळी यजमानांना म्हणजेच भारतीय संघाला शेवटपर्यंत कळलीच नाही, त्यामुळेच भारताला लाजीरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले.

दक्षिण आफ्रिकेनं ईडन गार्डन्सवर भारताविरुद्धच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना ३० धावांनी जिंकला. फक्त १२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेनं यजमान संघावर पलटवार केला. हा भारताचा दुसरा सर्वात कमी धावांचा पाठलाग होता. यापूर्वी, १९९७ मध्ये, ब्रिजटाऊनमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध भारताला १२० धावांचं लक्ष्य ठेवण्यात आलं होतं, परंतु संघ तो सामना जिंकू शकला नाही.

१२४ धावा हे घरच्या मैदानावर भारताला साध्य न झालेलं सर्वात कमी लक्ष्य आहे, ज्यामुळं पराभव झाला. १२४ धावांच्या प्रत्युत्तरात, भारतीय डाव फक्त ९३ धावांवर गुंडाळला गेला. दक्षिण आफ्रिकेच्या फिरकी आणि वेगवान गोलंदाजांनी असाधारण कामगिरी केली. गेल्या वर्षी, मुंबईत न्यूझीलंडविरुद्ध, भारताला १४७ धावांचं लक्ष्य गाठता आलं नाही आणि २५ धावांनी पराभव पत्करावा लागला. या दोन्ही सामन्यांमध्ये गौतम गंभीर भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक होते. त्यामुळे गौतम गुरुजींचे डावपेज, मार्गदर्शन कुठेतरी कमी पडतेय, असे म्हणायची वेळ आली आहे. संघातील भरोवशाचे गडी एकेका धावेसाठी दम टाकताना पाहून लाज वाटत होती. भारताच्या आजवरच्या पराभवांबाबत सांगायचे झाल्यास सर्वात लहान लक्ष्यांचा पाठलाग करण्यात भारताला याआधीही अपयश आलेय, याचे तमाम चाहते साक्षीदार आहेत. यामध्ये १२४ धावा- विरुद्ध दक्षिण आफ्रिका, कोलकाता (२०२५), १४७ धावा-विरुद्ध न्यूझीलंड, मुंबई (२०२४), २२१ धावा- विरुद्ध पाकिस्तान, बंगळुरू (१९८७), २३१ धावा-विरुद्ध ऑस्ट्रेलिया, कोलकाता (१९५६), २४२ धावा -विरुद्ध इंग्लंड, हैदराबाद (२०२४) या कसोटी सामन्यांचा सहभाग आहे. क्रिकेट चाहत्यांची भारतीय संघाकडून मायदेशात खेळत असताना विजयाची अपेक्षापूर्ती व्हावी, एवढीच इच्छा असते. एका-एका कसोटीसाठी लाखोंचे मानधन घेणाऱ्या भारताच्या क्रिकेटपटूंकडून आपल्याही काही अपेक्षा आहेत. या अपेक्षा दुसऱ्या-तिसऱ्या काही नसून, तमाम भारतीयांना फक्त नि फक्त विजय हवा आहे. २०२४ पूर्वी, भारतीय संघानं कधीही घरच्या मैदानावर २०० पेक्षा कमी धावांचं लक्ष्य असलेला कसोटी सामना गमावला नव्हता. परदेशी भूमीवरही, फक्त तीन वेळा भारतीय संघाला चौथ्या डावात २०० पेक्षा कमी धावांचं लक्ष्य देण्यात आलं होतं आणि तो सामना जिंकण्यात अपयशी ठरला होता.

गौतम गंभीर मुख्य प्रशिक्षक झाल्यापासून हे तीन वेळा घडलं आहे. हे गांभीर्याने घेण्यासारखेच आहे. इंग्लंड दौऱ्यादरम्यान, भारतीय संघ लॉर्ड्स कसोटीत १९३ धावांचं लक्ष्य गाठण्यात अपयशी ठरला. दरम्यान, २०० पेक्षा कमी धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा पानिपत झाले आहे. त्यामध्ये १२० विरुद्ध वेस्ट इंडिज, ब्रिजटाऊन (१९९७), १२४ विरुद्ध दक्षिण आफ्रिका, ईडन गार्डन्स (२०२५), १४७ विरुद्ध न्यूझीलंड, वानखेडे (२०२४), १७६ विरुद्ध श्रीलंका, गॉल (२०१५), १९३ विरुद्ध इंग्लंड, लॉर्ड्स (२०२५), १९४ विरुद्ध इंग्लंड, एजबॅस्टन (२०१८) या कसोटी सामन्यांनी भारताची कसोटी घेतली आहे. भारतीय संघाच्या बेभरोवशाच्या खेळाने क्रिकेटमध्ये आतापर्यंत गाठलेली उंची पार लयाला घालवली आहे. बुमराने आफ्रिकेच्या कर्णधाराला बुटका म्हणून डिवचले, परंतु त्याने आपली उंची खेळातून दाखवली. हे भारतीय खेळाडूंनी शिकण्यासारखे आहे.

लोकसंसद

## वाढत्या कार्बन उत्सर्जनाचे जागतिक संकट




१३० हून अधिक शास्त्रज्ञांच्या आंतरराष्ट्रीय पथकाने तयार केलेला 'ग्लोबल कार्बन बजेट-२०२५' हा २० वा वार्षिक अहवाल नुकताच प्रकाशित झाला आहे. या अहवालानुसार, गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा जीवाश्म इंधनांमधून होणाऱ्या कार्बन डायऑक्साइडच्या उत्सर्जनात १.१ टक्क्यांनी वाढ अपेक्षित असून कार्बन डायऑक्साइडचे एकूण उत्सर्जन तब्बल ३८.१ अब्ज टनांपर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडची पातळी ४२५.७ पीपीएम (प्रति दशलक्ष भाग) पर्यंत पोहोचेल जी औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या पातळीपेक्षा (अंदाजे २८० भाग प्रति दशलक्ष) ५२ टक्क्यांनी अधिक आहे. जीवाश्म इंधन कोळसा, तेल, नैसर्गिक वायू, जंगलतोड, मातीची धूप आणि शेती या सर्व घटकांमुळे मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन होते. ऊर्जेची वाढती जागतिक मागणी पूर्ण करण्यासाठी अनेक देश आजही कोळसा, तेल व नैसर्गिक वायूवर अवलंबून असल्यामुळे हवामान संकट तीव्र होण्याचा इशारा अहवालात देण्यात आला आहे. या गंभीर संकटाचा सामना करण्यासाठी जागतिक पातळीवर कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन कमी करण्यासाठी कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू यांसारख्या इंधनाचा वापर तातडीने कमी करून सौर ऊर्जा, पवन ऊर्जा इत्यादी अक्षय ऊर्जा स्रोतांचा वापर करण्याची गरज अहवालात व्यक्त केली आहे. भारताच्या जीवाश्म इंधनातून होणाऱ्या कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनात २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये होणारी ३.२ टक्के अपेक्षित घट दिलासा देणारी आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाचे उद्घाटन

आजकाल डोंगरी आदिवासी भागात लहान मुलांना शिकवायला जाणारे शिक्षक आपल्याला प्रेरणादायी भासतात. आधुनिक जगाचा गंधही नसलेले अनेक आदिवासी पाडे आजही आहेत. केवळ बोटावर मोजता येतील विद्यार्थ्यांसाठी त्या पाड्यात लांबचा पल्ला गाठत शिक्षक जातात.

ही परिस्थिती सध्याची आहे. तर ६० वर्षांआधी काय परिस्थिती असेल याची कल्पनाही करवत नाही. त्यामूळे ज्यांच्यापर्यंत शिक्षणाची संधी पोहोचलेलीच नाही, अशा समाजघटकांना ती उपलब्ध करून देणं, शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्यांना त्या प्रवाहामध्ये सामील करून घेणं आणि ग्रामीण भागातील गोरगरीब, तळागाळातील घटकांपर्यंत शिक्षणाचे लाभ पोहोचविणं असा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन कोल्हापूरात शिवाजी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

'ज्ञानमेवामृत' हे ब्रीद घेऊन पश्चिम महाराष्ट्राच्या उच्चशिक्षणाची गरज भागविण्यासाठी सुमारे ५० वर्षांपूर्वी दि. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठ अंतर्गत पूर्वी कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी आणि सोलापूर हे पाच जिल्हे येत होते. पण, रत्नागिरी मुंबई विद्यापीठात तर सोलापूर जिल्हा सोलापूर विद्यापीठात राहिला यामूळे आता शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात तीन जिल्हे येतात.

ही सध्याची परिस्थिती असली तरी विद्यापीठ स्थापनेसाठी अनेकांना घाम गाळावा लागला आहे. यामध्ये प्रमूख नाव हे लोकनेते दिवंगत दौलतराव उर्फ बाळासाहेब श्रीपतराव देसाई यांचे आहे. कारण त्यांच्या प्रयत्नानेच कोल्हापूरात शिवाजी विद्यापीठाला मान्यता देण्यात आली आहे. त्यावेळी कोल्हापूर शहराच्या नगराध्यक्षपदी केशवराव जगदाळे होते. विद्यापीठाला मान्यता मिळाली पण ते स्थापन कूठे करायचे, हे निश्चित नव्हते. तशी जागाही नव्हती. त्यामूळे विद्यापीठ स्थापनेत अनेक अडचणी येत होत्या. त्याकाळात कोल्हापूर जिल्ह्याचा विचार केला तर पूर्वेकडील माळरान रीकामेच होते. पण, ते अनेक लोकांच्या मालकीचे होते. त्या जागा मागण्याचीही गरज पडली नाही. जगदाळे, सरनाईक, पायमल, साळुंखे, थोरात, मंडलिक, माने यासारख्या अनेक दानशूर लोकांनी केवळ हजार ते ५ हजार एवढ्या कमी किंमतीत विद्यापीठाला जागा देऊन टाकल्या.

जागा मिळाली आणि विद्यापीठाचे बांधकामही सुरू झाले. या बांधकामात श्रमदान करण्यासाठी कोल्हापूरातील पैलवानांनी पुढाकार घेतला. भरलेल्या ट्रकातून पैलवान रोज माळरानावर जाऊन काम करायचे. त्यांनीच रानमाळावरचे गवत कापून ती जमीन सपाट करून घेतली. आणि तिथे बांधकामास सुरूवात झाली. विद्यापीठाच्या बांधकामासाठी आर्थिक मदत करणारे अनेक हात होते. पण, खेडोपोडी, शहरातील लोकांचाही या ज्ञानामृत कामात खारीचा वाटा असावा या हेतूने एक रूपयांची कूपन्सही काढून वाटण्यात आली. या केशवराव जगदाळे, रामभाऊ उबाळे, डी.एस. नार्वेकर, हिंदुराव साळुंखे, बाळ साठम, काका राऊत, ए. आर साळोखे हे कार्यकर्ते सायकलवरून गावभर फिरून ही कुपणे विकत होते. यातून विद्यापीठासाठी मदत उभी राहिली.कोल्हापूरातील सध्याचे ओपल हॉटेल म्हणजे महागावकर सदनात विद्यापीठाचे तात्पुरते काम काज सुरू होते. या ठिकाणीच विद्यापीठाशी संबंधीत बैठका आणि इतर महत्त्वाची कामे पार पाडली जायची. याच ठिकाणी पैसे एकत्र केले जात होते. इथूनच विद्यापीठाची पायाभरणी केली जात होती असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. विद्यापीठाचे उद्घाटन १८ नोव्हेंबर १९६२ रोजी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते करण्यात आले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१८ नोव्हेंबर**

१) श्री.वामन पांडुरंग पाटील
रामनाथ रोड, अलिबाग
१८-११-१९३७
२)श्रीम.हेमलता पुरूषोत्तम प्रभू
घरत आळी, अलिबाग
दि.१८-११-१९५२
३)श्री.भरत रामचंद्र सातपुते
अलिबाग दि.१८-११-१९५४

## विद्यार्थिनीचा विनयभंग

**मुंबई :** स्कूल व्हॅनचालकाने तीन शाळकरी मुलींचा विनयभंग केल्याची घटना विलेपार्ले येथे घडली आहे. तक्रारदार महिला या सांताक्रुझ येथे राहतात. त्यांची मुलगी विलेपार्ले येथील एका नामांकित शाळेत शिकते. आरोपी हा मुलींना शाळेत ने-आण करण्याचे काम करतो. अटक आरोपीने मुलींना शाळेच्या व्हॅनमध्ये बसवताना त्यांच्याशी गैरवर्तन केले. मुलीशी नकोसे कृत्य करून विनयभंग केल्याचा आरोप आहे. याची माहिती मुलींनी त्यांच्या पालकांना दिली. त्यानंतर जुहू पोलिसांनी गुन्हा नोंद करून चालकाला अटक केली.

## माहीम येथे सापडले मृत अर्भक

**मुंबई :** माहीम येथील हिंदुजा रुग्णालयाजवळील चौपाटी येथे मृत अर्भक आढळून आले. मीरा कासटे या माहीम पोलीस ठाण्यात काम करतात. शनिवारी सकाळी त्यांना नियंत्रण कक्षातून माहिती देण्यात आली. माहीम हिंदुजा चौपाटी येथे एक अर्भक बेशुद्ध अवस्थेत आढळून आल्याचे सांगण्यात आले. त्या अर्भकाला उपचारासाठी सायन रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी ते अर्भक तपासून मृत घोषित केले. अर्भकाच्या हातावर आणि दंडावर जखमा होत्या.

# सीएनजी इंधनाचा तुटवडा

## ● पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा; वाहनचालकांसह नागरिकांचे हाल

**| ठाणे | प्रतिनिधी |**

**शहर आणि उपनगरांत रविवारी सीएनजीचा गंभीर तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे शहरातील अनेक सीएनजी पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अचानक झालेल्या तुटवड्यामुळे वाहनचालकांचे प्रचंड हाल झाले. आरसीएफ कंपाऊंड येथील गेलच्या मुख्य गॅस पाईपलाईनमध्ये बिघाड झाल्याने त्याचा परिणाम शहरातील सीएनजीच्या पुरवठ्यावर झाला. तर गॅस नसल्याने टॅक्सी, रिक्षा, अ‍ॅप आधारीत खासगी वाहनांच्या सेवा प्रभावित होऊ लागल्या आहेत.**



गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात वाहने सीएनजीवर धावत आहेत. ठाण्यात टीएमटीची सार्वजनिक वाहतूक लोकसंख्येच्या तुलनेत पुरेशी नाही. त्यामुळे ठाण्यातील बहुतांश नागरिक शेअर रिक्षा किंवा मीटरच्या रिक्षाने वाहतुकीचा पर्याय निवडतात. या सर्व रिक्षा सीएनजी इंधनावर धावणाऱ्या आहेत. तर अनेक कारमध्ये देखील सीएनजी बसविण्यात आल्या आहेत.

सीएनजीचा पुरवठा प्रभावित झाल्याने अनेक रविवारी सीएनजी पंपवर इंधन पुरेसे उपलब्ध होऊ शकले नाही. त्यामुळे रिक्षाचालक तसेच इतर वाहन चालकांची सीएनजी पंपवर इंधन मिळावे यासाठी अक्षरशः शोधाशोध सुरु होती. ठाण्यातील काही सीएनजी पंपवर एक ते दीड किमीपर्यंत रांगा लागल्याचे चित्र होते. सीएनजी उपलब्ध न झाल्याने रिक्षा चालकांचा दैनंदिन व्यवसाय बुडाला. तर नागरिकांनाही वेळेत रिक्षा उपलब्ध न झाल्याने त्यांना वेळेत कामाच्या ठिकाणी पोहचता आले नाही. बसथांब्यांवरही प्रवाशांच्या रांगा लागल्या होत्या. तसेच बसगाड्यांमध्ये प्रवाशांची गर्दी दिसत होती. त्यामुळे सोमवारी सकाळी कामानिमित्ताने बाहेर पडणाऱ्या नागरिकांचे प्रचंड हाल झाले.

> **रविवारी संध्याकाळपासूनच ठाणे शहरातील सर्वच सीएनजी पंपवर भली मोठी रांग होती. दोन ते तीन तास सीएनजी पंपवर प्रतिक्षा करावी लागली. त्यामुळे वेळचे तर नुकसान झालेच; परंतु आमचा** दैनंदिन व्यवसाय बुडून आर्थिक नूकसानही झाले.
> **– संजय चव्हाण, रिक्षा चालक, ठाणे**

# वीजचोरी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**| ठाणे | प्रतिनिधी |**

विद्युत मीटरमध्ये छेडछाड करून ४२ लाखांची वीजचोरी करणाऱ्या दोघांविरोधात कोपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवराम शेट्टी व शैलेश डेढिया अशी त्यांची नावे आहेत. या वीज चोरांनी मागील दोन वर्षांत रिमोट सर्किटच्या मदतीने १ लाखाहून अधिक युनिटचा वापर करत महावितरणची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे.



कोलशेत परिसरातील द रेकडी हॉटेलच्या मीटर रीडिंग डेटामध्ये अनियमितता दिसून आली. याबाबत भांडुप परिमंडळाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी कोलशेत उपविभागाला मीटर तपासण्याचे आदेश दिले. त्यानुसार उपविभागातील सहाय्यक अभियंता विठ्ठल माने, फॉरमन किरण दंडवते व प्रधान तंत्रज्ञ राजेंद्र बने यांनी हॉटेलच्या मीटरची तपासणी केली असता ग्राहकाने मीटरमध्ये छेडछाड केल्याचे दिसले. सखोल तपास केला असता ग्राहकाने रिमोट सर्किट लावून वीजचोरी केल्याचे निष्पन्न होताच पथकाने ग्राहक शिवराम शेट्टी व विद्युत वापरकर्ता शैलेश डेढियाविरोधात गुन्हा दाखल केला.

> **वीजचोरी हा फौजदारी गुन्हा असून ग्राहकांनी अधिकृतपणे विजेचा वापर करावा. अनधिकृत वीज वापरल्यास याचा भार प्रामाणिक ग्राहकांवर पडतो. महावितरणची वीज चोरांविरुद्ध मोहीम सुरूच राहणार आहे व यापुढे अशी वीजचोरी आढळल्यास वीज चोरांवर कठोर कारवाई करण्यात येईल.**
> **– संजय पाटील, मुख्य अभियंता, भांडुप परिमंडळ**

## कडवईत श्रमदानातून बांधला बंधारा

**संगमेश्वर :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत कडवईत विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ग्रामपंचायत हद्दीतील धामणाकवाडी येथील पाणीपुरवठा विहिरीशेजारी ग्रामस्थांनी श्रमदान करत बंधारा बांधला तसेच विहिरीच्या आजूबाजूचा परिसर स्वछ करण्यात आला. या बंधाऱ्यामुळे या विहिरींची पाणीपातळी ही समतोल राहणार असून, तुटवड्याच्या काळात ग्रामस्थांना याचा चांगला फायदा होणार आहे. यावेळी ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

# पालघर-संभाजीनगर बसचा अपघात

## २५ हून अधिक प्रवासी जखमी

**| पालघर | प्रतिनिधी |**

पालघर-छत्रपती संभाजी महाराजनगर बसचा (एम.एच ०६, ९५७०) देवगाव फाट्यानजीक वळणार अपघात झाला. यामध्ये तीन जण गंभीर, तर २५ हून अधिक प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. जखमींना खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्र व त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.



पालघर आगाराची पालघरहून ७ वाजता सुटणारी पालघर-वाडा-छत्रपती संभाजी महाराजनगर बस नाशिककडे जात होती. पालघर जिल्ह्याची हद्द संपताच अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर श्रीघाट ते देवगांवच्या दरम्यान, देवगांव फाट्याजवळ सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास वळणार चालकाचा ताबा सुटल्याने बस रस्त्याच्या बाजूला जाऊन कोसळली. यावेळी बसमध्ये एकूण ३८ प्रवासी प्रवास करत होते. यामध्ये शिवराम झुगरे यांच्या नाकातोंडातून रक्तस्त्राव सुरू झाल्याने, त्यांना खोडाळा येथे हलविण्यात आले. तर चंद्रकांत शिद यांना बरगडीला मार लागून जखमी झाले. साहेबनूरबी खान या वयोवृध्द महिलेच्या हाताला आणि कमरेला जबर मार बसला आहे. त्यांच्यावर खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत. तर दोन गंभीर जखमींना त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयात, तर इतर किरकोळ जखमींवर खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले आहेत. यामध्ये वाहक व चालक सुरक्षित आहेत. बसचालक मधुकर चव्हाण हे गाडी चालवताना, भ्रमणध्वनीवरून बोलत असल्याची माहीती काही अपघातग्रस्तांनी दिली आहे.

## तिघे गंभीर

# वारघडपाड्यावर एआयची नजर

**| ठाणे | प्रतिनिधी |**

बिबट्याच्या हल्ल्यापासून नागरिकांना स्वतःचा बचाव करता यावा यासाठी मोखाडा तालुक्यातील वारघडपाड्यात वनविभागाने एआय कॅमेरा बसवला आहे. १०० मीटर अंतरावर बिबट्या दिसताच कॅमेऱ्याचा सायरन वाजणार असून त्यामुळे नागरिक सतर्क होणार आहेत. याआधी बिबट्याच्या हल्ल्यात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या एआय कॅमेऱ्यामुळे मोखाडावासीय काहीसे निर्धास्त झाले आहेत.

मोखाडा तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून बिबट्या फिरत असल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि एकच धावपळ उडाली. गेल्या आठवड्यात बिबट्याने दुचाकीस्वारावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच दोन दिवसांपूर्वी खोडाळा-मोखाडा मार्गावरील देवबांध पुलावर बिबट्या नागरिकांना दिसला होता. या बिबट्याने आतापर्यंत अनेक बकऱ्या, वासरे आणि कुत्रे फस्त केले आहेत. या पार्श्वभूमीवर वनविभागाने वारघडपाड्यात सौरऊर्जेवर चालणारा एआय कॅमेरा लावला आहे. बिबट्या आल्याचे दिसताच हा कॅमेरा सायरन वाजवणार असून त्याचा आवाज सुमारे एक किलोमीटरपर्यंत पोहोचणार आहे.

# चिवेली गावात बिबट्याचा वावर

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

चिपळूण तालुक्यातील चिवेली गावात गेल्या दोन ते तीन दिवसांपासून बिबट्या दिसल्याच्या घटनांनी ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. यासंदर्भात चिवेली ग्रामपंचायतीचे सरपंच योगेश शिर्के यांनी वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

चिवेली गावाच्या सीमेजवळ तसेच काहीवेळा वस्ती भागातही बिबट्याचे दर्शन झाल्याने शाळा, अंगणवाडी, शेती क्षेत्र आणि जंगलालगतची घरं धोक्याच्या छायेत आली आहेत. नागरिकांमध्ये वाढलेल्या दहशतीच्या पार्श्वभूमीवर वनविभागाला निवेदन देण्यात आले आहे. बिबट्याचा शोध जंगलात घेऊन त्याला पकडण्यासाठी पिंजरा लावणे, वन कर्मचाऱ्यांची नियमित गस्त, नागरिकांना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन तसेच आवश्यक असल्यास वन्यजीव तज्ज्ञांच्या मदतीने बिबट्याला सुरक्षितपणे हलवण्याची मागणी ग्रामपंचायतीने केली आहे.

# जिल्हा परिषद शाळेला ठोकले टाळे

## शिक्षकांच्या कमतरतेमुळे पालक आक्रमक

**| वसई | प्रतिनिधी |**

वसईतील कामण येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत शिक्षकांची कमतरता असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार पालकांनी शिक्षणविभागाकडे केली आहे. परंतु, यावर तात्काळ कारवाई न झाल्यामुळे अखेर संतप्त झालेल्या पालकांनी सोमवारी जिल्हा परिषद शाळेला टाळे ठोकत आंदोलन केले आहे.

कामण येथील जिल्हापरिषदेच्या शाळेत सद्यस्थित १ हजार ४६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, शाळेत फक्त ९ शिक्षक कार्यरत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचा परिणाम होत असल्याची तक्रार पालकांनी केली आहे. सामाजिक कार्यकर्ते दिनेश म्हात्रे व रजनीकांत म्हात्रे यांनी तात्काळ शिक्षकांची भरती करावी, अशी मागणी वसईच्या शिक्षण विभागाकडे केली होती. नुकताच विरार येथे पार पडलेल्या पालकमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात ही शिक्षक कमतरतेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. तर यासंबंधी जिल्हापरिषद सीईओंशी बैठक करून तोडगा काढला जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिली होती. परंतु, वारंवार तक्रार करूनही या समस्येवर तोडगा न निघाल्यामुळे सोमवारी संतप्त पालक व ग्रामस्थांनी मोर्चा काढला. त्यानंतर संतप्त आंदोलकांनी चक्क शाळेला टाळे ठोकले.

**पाच शिक्षक उपलब्ध करून देण्याचे आश्वासन**

कामण जिल्हा परिषद शाळेला टाळे ठोकल्यानंतर तातडीने तालुक्याची पंचायत समिती खडबडून जागी झाली आहे. गटविकास अधिकारी छत्तरसिंग राजपूत यांनी तातडीने तेथील ग्रामस्थांशी भ्रमणध्वनीवर चर्चा करून नवीन पाच शिक्षक उपलब्ध करून दिले जातील. तसेच यासंबंधी आदेश ही काढले आहेत असे आश्वासन दिले. त्यानंतर संतप्त ग्रामस्थ आणि पालकांनी पुन्हा शाळेला ठोकलेले टाळे उघडले.

**चालक-वाहकांना मिळणार समान काम** | **गैरव्यवस्थापनाला बसणार आळा**

# एसटीची ड्युटी होणार ‘रोटेशन’ पद्धतीने

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) चालक आणि वाहकांच्या ड्युटी वाटपात पारदर्शकता आणण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व आगारांमध्ये चालक आणि वाहकांची ड्युटी आता ‘रोटेशन’ पद्धतीने केली जाणार आहे. काही ठिकाणी ओळखीच्या आधारे ‘सोयीची ड्युटी’ मिळत असल्याच्या तक्रारींनंतर हे परिपत्रक जारी करण्यात आले आहे.**



एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष माधव कुसेकर यांनी सर्व विभागीय नियंत्रकांना या संदर्भात आदेश दिले असून, कोणत्याही आगारात ‘सोयीची ड्युटी’ देण्यात आल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. काही चालक आणि वाहकांना सातत्याने जवळच्या किंवा ‘सोयीची ड्युटी’ मिळत होत्या, तर इतरांवर लांब पल्ल्याच्या फेऱ्यांचा ताण पडत होता. या असमतोलामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आणि वादाची परिस्थिती निर्माण होत होती. आता नव्या रोटेशन प्रणालीमुळे सर्वांना समान संधी मिळणार असून, ड्युटीचे वाटप अधिक सुसूत्र होणार आहे.

एसटी महामंडळाने ड्युटी वाटप करताना दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. म्हणजेच, एखाद्या चालकाने एका दिवशी लांब पल्ल्याची ड्युटी केल्यास दुसऱ्या दिवशी त्याला जवळची ड्युटी देण्यात येईल.

रोटेशन प्रणालीनुसार चालक वाहकांची ड्युटी लावण्याची पद्धत तशी जुनी आहे. मात्र, काही विभागातील आगारांत सोयीची ड्युटी देण्यात येत होती. एसटी विभागातील विविध आगारांतील चालक-वाहक ओळखीचा फायदा घेऊन सोयीची ड्युटी घेत होते. असा प्रकार वर्षानुवर्षे सुरुच होता. मात्र याचा इतर कर्मचाऱ्यांवर लांब पल्ल्याच्या ड्युटीचा ताण पडत होता. तसेच वादावादी होत होती. त्यामुळे एसटी महामंडळाकडे तक्रार गेल्यामुळे आता रोटेशनपद्धतीने ड्युटी लावावी, असे परिपत्रकच एसटी महामंडळाने राज्यातील सर्वच विभाग नियंत्रकांना दिले आहे. त्यामुळे सोयीची ड्युटी करणाऱ्या चालक-वाहकांना चाप बसणार आहे.

**...तर अधिकाऱ्यांवर कारवाई होणार**

**प्रत्येक आगारात चालक आणि वाहकांना ड्युटीचे वाटप करताना कोणालाही सोयीची ड्युटी देण्यात येणार नसून रोटेशन पद्धतीने ड्युटी सुरू होणार आहे. याची तंतोतंत अंमलबजावणी करावी, असा आदेश देण्यात आला आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा ही देण्यात आला आहे.**

# निवडक

## बीएसएनएल कार्यालयात चोरी

**रत्नागिरी :** दापोली शहरातील बीएसएनएल कार्यालयात घुसून जवळपास ९,९५० रुपयांचा साहित्य ऐवज चोरीला गेला. ही घटना १२ नोव्हेंबरच्या संध्याकाळी ते १३ नोव्हेंबरच्या सकाळी दरम्यान घडली. याप्रकरणी गोपी रतन जाधव (२३, रा. खेर्डी, खालची पेठ, चिपळूण) याच्याविरुद्ध दापोली पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. दूरसंचार अभियंता विजय राम मीना (३५) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बीएसएनएल कार्यालयातील सी-डॉट एक्सचेंज कक्षाच्या भिंतीवरील एक्झॉस्ट फॅनच्या जागेतील होलचा वापर करून आरोपी जाधवने आत प्रवेश केला. चोरीच्या उद्देशाने कक्षात घुसलेल्या आरोपीने तेथील विविध साहित्यावर हात साफ केला. चोरीस गेलेल्या ऐवजामध्ये ३,४०० रुपये किंमतीची कॉपर एसी कुलंट पाईप, पिवळ्या व लाल रंगाच्या तांब्याच्या पाईपा, ५०० रुपये किंमतीचा एसी फिल्टर एलिमिनेटर, २,०५० रुपये किंमतीचे अर्थिंग केबल, काळ्यालालपिवळ्या रंगाच्या २.५ मीटर केबली, तसेच ४,००० रुपये किंमतीचा रेक्टिफायर असा एकूण ९,९५० रुपयांचा माल समाविष्ट आहे. दापोली पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## गुहागरमध्ये विशेष कुष्ठरोग शोध मोहीम

**चिपळूण :** चिपळूण तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात विशेष कुष्ठरोग रुग्ण शोध मोहीम राबविण्यात येणार आहे. ही मोहीम दि.१७ नोव्हेंबर ते दि.२ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. या मोहिमेमध्ये आरोग्य पथकामार्फत घरोघरी जाऊन सर्व महिला व पुरुष यांची शारीरिक तपासणी करून नवीन रुग्ण आढळून आल्यास त्यांना उपचार देण्यात येणार आहे. तसेच संशयित रुग्णांची तपासणी करून वैद्यकीय अधिकारी निश्चित निदान करणार आहेत. या मोहिमेसाठी आरोग्य कर्मचाऱ्यांचे आवश्यक प्रशिक्षण तालुकास्तरावर आणि प्रा. आ. केंद्र स्तरावर घेण्यात आले आहे. मोहिमेची माहिती आणि प्रसिद्धी आशा सेविकांमार्फत करण्यात येत आहे. एकूण १० लाख ७ हजार ९१२ लोकसंखेसाठी ९३ टीम कार्यरत राहणार असून १८६ सदस्य व १९ पर्यवेक्षक तसेच प्रत्येक तपासणी पथकात दोन सदस्य असणार आहेत. एक आशा सेविका आणि एक पुरुष स्वयंसेवक यासोबत असणार आहेत. दरम्यान शरीरावर न खाजणारा, न दुखणारा फिकट लालसर पांढरा रंगाचा चट्टा असल्यास आरोग्य टीमकडून तपासणी करून घ्यावी. तसेच, खासगी रुग्णालयात कुष्ठरोग संशयित रुग्ण आढळून आल्यास संबंधित डॉक्टरांनी आरोग्य विभागास माहिती द्यावी, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. घन:श्याम जांगीड यांनी केले आहे.




## ‘या’ मार्गावर अखेर गतिरोधक बसविले

**पालघर :** पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळपासून संध्याकाळी उशिरापर्यंत नागरिकांची व अधिकारी वर्गांची ये-जा सुरू असते. यासह या मार्गावर असलेल्या औद्योगिक वसाहत शाळा महाविद्यालय यामुळे रहदारी अधिक असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर निघताना छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून व बोईसरकडून भरधाव येणाऱ्या वाहनांना वेग नियंत्रणात ठेवणे कठीण जाते. तर अनेकदा प्रवेशद्वारातून बाहेर निघणाऱ्या वाहनाला अथवा व्यक्तीला समोरून येणाऱ्या वाहनाचा अंदाज न आल्यामुळे अपघात होण्याचे प्रकार देखील या मार्गावर घडले आहेत. या मार्गावर गतिरोधक बसविणे गरजेचे होते. अखेर पालघर बोईसर मार्गावर मुख्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या जवळ दोन गतिरोधक बसविण्यात आले आहेत. त्यामुळे काही प्रमाणात वेग मर्यादेवर नियंत्रण येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून बोईसरकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य होते. मात्र गेल्या काही दिवसापासून सार्वजनिक बांधकाम विभाग व नगरपरिषदेकडून पालघर शहरातील खड्डे दुरुस्ती हाती घेण्यात आली असून अधिकतर महत्त्वाचे खड्डेही बुजविण्यात आले आहेत.



## रिक्षा चोरी करणारा अटकेत

**पालघर :** वसई विरार शहराच्या विविध ठिकाणच्या भागातून सातत्याने वाहन चोरी होण्याच्या घटना समोर येत असतात. नुकताच नालासोपारा पूर्वेच्या आचोळे गाव परीसरात राहणारे जितेश ठाकूरदीन गौंड या रिक्षा चालकाची रिक्षा चोरी झाल्याची घटना घडली होती. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार पोलिसांनी पथक तयार करून या गुन्ह्याचा तपास सुरू केला होता. मिळालेल्या माहितीनुसार विरार पूर्वेच्या कुंभार पाडा येथून या आरोपीला अटक केली आहे. प्रकाश पुकराज त्रिवेदी (३३) असे या आरोपीचे नाव त्यांच्या कडून चोरी केलेल्या १ लाख ७० हजार रुपये किंमतीच्या चार रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच, आरोपी प्रकाश त्रिवेदी हा सराईत गुन्हेगार असून त्याने अन्य ठिकाणी ही वाहने चोरी केली आहे. त्यावर विरार पोलीस ठाण्यात ४, वालीव १, नयानगर १ आणि काशीमिरा २ असे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.



## ‘भाषा वादाचे नव्हे संवादाचे माध्यम’

**मुंबई :** भाषा ही वादासाठी नव्हे तर संवादाचे माध्यम आहे. विविध भाषांच्या आदानप्रदानातून संस्कृतीचा विकास होत असतो. हिंदी पत्रकारिता द्विशताब्दी वर्षानिमित्त आयोजित मराठी हिंदी संपादक पत्रकारांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन हे त्या दिशेने टाकलेले एक स्तुत्य आणि उत्तम पाऊल आहे, अशा शब्दांत महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी कौतुकाची भावना व्यक्त केली. मुंबई मराठी पत्रकार संघ आणि काशीवाराणसी विरासत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय हिंदी पत्रकारिता द्विशताब्दी साहित्य व मीडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या आझाद मैदान येथील पत्रकार भवनात आयोजित या सोहळ्यात देशभरातील १७ राज्यांतील संपादक, लेखक, अभ्यासक आणि पत्रकार सहभागी झाले होते. महाराष्ट्र राज्य साहित्य अकादमी, केंद्रीय शिक्षण मंत्रालय तसेच उत्तर प्रदेश शासनाचे सहकार्य या महोत्सवाला लाभले. हिंदीतील पहिले वृत्तपत्र ‘उदन्त मार्तण्ड’ याच्या प्रकाशनाला यावर्षी २०० वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने ज्येष्ठ पत्रकार राही भिडे, कमलेश सुतार, रेखा देशपांडे, विश्वास देवकर, शरद वैद्य (मरणोत्तर) यांना सन्मानित करण्यात आले.

# निवडक

## खालापुरात वातावरणात गारवा

**पाताळगंगा :** वातावरणात गारवा निर्माण होत असल्यामुळे खालापूर तालुक्यात जोरदार थंडी पडू लागली आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून अचानक कडाक्याची थंडी जाणवू लागली असून, तापमानात मोठी घसरण नोंदवली गेली आहे. पहाटे लवकर आणि रात्री उशिरा जाणवणाऱ्या तीव्र थंडीमुळे नागरिक अक्षरशः कुडकुडत आहेत. या अचानक वाढलेल्या गारव्यामुळे रस्ते, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणची वर्दळही कमी झाल्याचे चित्र आहे. तालुक्यात थंडी वाढल्यामुळे सकाळी अनेक ठिकाणी नागरिकांनी घरासमोर शेकोट्या पेटवलेल्या दिसत आहेत. चहा-कॉफी केंद्रांवर मोठी गर्दी असून, नागरिक थंडीपासून बचावासाठी विशेषतः चहा-कॉफीसारख्या गरम पेयांना प्राधान्य देत आहेत. रिक्षाचालक आणि बांधकाम मजूर यांसारख्या बाहेरील कामगारांना या कडक थंडीमुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. थंडीचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मोठ्या प्रमाणात बसत आहे.

## हरिश्चंद्र यादव यांचे निधन



**वेणगाव :** कर्जत तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील निष्ठावंत ज्येष्ठ नेते कर्जत बुद्ध नगर येथील रहिवाशी हरिश्चंद्र गणपत यादव यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने बुधवार (दि.१२) नोव्हेंबर रोजी राहत्या घरी निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ७१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, दोन मुलगे, दोन सुना, यांच्यासह त्यांचा मोठा परिवार आहे. यांच्या पार्थिवावर कर्जत स्मशानभूमीत गुरुवार (दि. १३) नोव्हेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ॲड. कैलास मोरे, दीपक गायकवाड, संतोष भोईर, मधुकर घारे, आदीसह कर्जत - खालापूर तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर, कर्जत बाजारपेठेतील व्यापारी वर्ग, तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, नातेवाईक मित्रपरिवार व कर्जत तालुक्यातील नागरिक यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

## दिनेश अडावदकरांना 'रापा' पुरस्कार

**कर्जत :** 'रापा' अर्थात रेडिओ ॲण्ड टेलिव्हिजन प्रोफेशनल असोसिएशन या संस्थेतर्फे माहिती व मनोरंजन क्षेत्रातील माध्यम कर्मींना दरवर्षी वेगवेगळ्या श्रेणीतील पुरस्कारांनी सन्मानित केले जाते. नुकतेच मुंबईतील हॉटेल ऑर्किड येथे आयोजित करण्यात आले होते. यामध्ये कर्जतचे दिनेश अडावदकर यांना आकाशवाणीवरील कार्यक्रमाबद्दल 'रापा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अडावदकर यांचा आवाज गेल्या अनेक वर्षांपासून रेडिओच्या माध्यमातून सर्वांना सुपरिचित आहे. तसेच त्यांनी केलेले विविध कार्यक्रम, जाहिराती, मान्यवरांच्या मुलाखतीही लोकप्रिय ठरलेल्या आहेत. रापाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हा पुरस्कार अडावदकर यांना मिळाला याबद्दल कर्जतकरांतर्फे त्यांचे कौतुक केले जात आहे. याप्रसंगी प्रसिद्ध चित्रपट निर्माते किरण शांताराम, ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी, प्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ आणि पर्यावरण तज्ञ उज्ज्वल निरगुडकर, रापाचे प्रमुख रत्नाकर तारदाळकर तसेच चित्रपट, रेडिओ, टिव्ही, ओटीटी, यूट्युब या माध्यमातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## राजिप चोंढी शाळेत आरोग्य तपासणी

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची रोटरी क्लब ऑफ सिशोर, आय. ए. पी. रायगड, ए. एच. ए. रायगड व ग्रुप ग्रामपंचायत किहीम यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचारासह मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांची वजन, उंची, ऑक्सिजन लेव्हल, रक्त गट, बीएमआय. इंडेक्स व इतर तपासण्या करण्यात आल्या. या आरोग्य तपासणी शिबिरात अंकुश पाटील, निलेश म्हात्रे, जनार्दन चापडे, तन्वी शेट्ये, बालरोग तज्ञ डॉ. राजेंद्र चांदोरकर, डॉ. दिपक गोसावी, किहीम सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड, केंद्रप्रमुख नितीन पाटील, मुख्याध्यापिका विद्या पेढवी, नितीन वाकडे, चेतन कोळी, सुप्रिया महाले व इतर मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन वाकडे यांनी केले होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे.** अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- **श्री इलेक्ट्रीकल अँड प्लंबिंग वर्क्स,** चेंढरे मारुती मंदिराशेजारी कामासाठी ड्रायव्हर, इलेक्ट्रिशन, वायरमन व प्लंबर या कामाचा अनुभव असलेली मुले पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा पगार रु. १५०००/- संपर्क- ९४२२६९०८५३,७८७५६८३७७३
- **कंपनी अधिकाऱ्यांच्या गृपकरीता भाडेतत्त्वावर १२०० स्वे.फुट** दोन बेडरूम किचन व हाप बेडरूम ३०० फुट गॅलरीसह अधिकाऱ्यांच्या गाड्यांच्या पार्किंगसह कॉटेज सर्व सोयीयुक्त भाडेतत्त्वावर देणे आहे. संपर्क - ८०१०६३४३५७
- **पाहिजे अलिबागमधील पॅथॉलॉजीकल** लॅबमध्ये सकाळी नऊ ते पाच वाजेपर्यंत कामासाठी मदतनीस मावशी पगार आठ हजार संपर्क- ९३७२५४९५३२
- **अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स,** वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# सर्वेक्षण पथक ठरतेय डोकेदुखी

- **गाड्या, बॅगा तपासल्या जात असल्याने पर्यटक फिरताहेत माघारी**
- **निवडणूक यंत्रणेने हस्तक्षेप करावा, व्यावसायिकांची मागणी**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

राज्यात नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू आहे. माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी निवडणूक सुरू असून माथेरानमध्ये प्रवेश करण्यासाठी एकमेव रस्ता स्थिर पथकाच्या तपासणी नाक्यामुळे माथेरानमधील व्यावसायिक नाराज आहेत. पर्यटनासाठी येणारे पर्यटकांच्या बॅगा तसेच वाहने तपासली जात असल्याने अनेक पर्यटक आपल्या किंमती वस्तूंचे नुकसान होऊ नये म्हणून माघारी देखील फिरू लागले आहेत. दरम्यान, माथेरानमधील हॉटेल व्यावसायिक आणि दुकानदारांनी या पर्यटन स्थळावर असे नियम बाजूला ठेवायला हवेत अशी मागणी करून निवडणूक यंत्रणेने हस्तक्षेप करावा अशी मागणी केली आहे.

नगरपरिषद निवडणुकीसाठी लावण्यात आलेली आचारसंहिता यांचे पालन व्हावे यासाठी निवडणूक यंत्रणांकडून वेगवगेळी पथके कार्यरत आहेत. राज्यातील सर्व नगरपरिषद ठिकाणी अशी पथके कार्यरत आहेत. नगरपरिषद क्षेत्रात प्रवेश करणारी वाहने यांची तपासणी करून बेकायदेशीरपणे अवैध वाहतूक होऊ नये यासाठी स्थिर सर्वेक्षण पथक कार्यरत आहे. माथेरान थंड हवेच्या ठिकाणी गिरीस्थान नगरपरिषद असून तेथे देखील दोन डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. सध्या माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी शहरात अवैद्य मद्य, पैशाची हत्यारांची अवैद्य वाहतूक होत असल्याने त्यावर रोख लावण्यासाठी माथेरान शहरात प्रवेश करणाऱ्या प्रवेशद्वारावर हे पथक २४ तास सेवा बजावत आहे. स्थिर सर्वेक्षण पथकामधील टीमकडून शहरात येणाऱ्या वाहनांची तपासणी केली जात आहे. त्यात प्रामुख्याने स्थानिक वाहनाऐवजी पर्यटक ज्या वाहनातून शहरात येत आहेत अशा वाहनांची तपासणी केली जात आहे. पर्यटनासाठी आलेले पर्यटक हे अनेकदा विदेश मद्य स्वतःच्या सेवनासाठी सोबत घेऊन येत असतात. पर्यटन स्थळ असल्याने मद्याचे दर माथेरानमधील हॉटेल्स आणि बार येथे अधिक असतील या शंकेने पर्यटक ही काळजी घेत असतात. मात्र, आदर्श आचारसंहिता अशा पर्यटक लोकांना अडचणीची ठरत आहे.

माथेरानच्या दस्तुरी नाका येथे बनवण्यात आलेल्या स्थिर सर्वेक्षण पथकाकडून तपासणी केली जात आहे. तसेच नेरळ येथून नेरळ माथेरान मिनी ट्रेनने प्रवास करणाऱ्या पथकाकडून माथेरान स्टेशन येथे स्थिर सर्वेक्षण पथक कार्यरत आहे. या पथकाकडून केवळ पर्यटकांची वाहने तपासली जात असल्याने मोठा गोंधळ पर्यटकांच्या मनात निर्माण झाला आहे. हजारो रुपये किमतीचे मद्य स्वतःच्या मद्यपान करण्यासाठी आणल्याने ते जप्त करण्यात येत असल्याने पर्यटक नाराजी व्यक्त करीत आहेत. मद्याच्या अशा अनेक बॉटल जमा करण्यात येत असल्याने या तपासणी नाक्याचा थेट परिणाम माथेरानमधील पर्यटनावर होऊ लागला आहे.

निवडणूक आचारसंहिता लागू करण्यात आली असलेल्या स्थिर सर्वेक्षण पथकांनी सुरू केलेल्या वाहने तपासणी मोहीममुळे माथेरानमधील पर्यटन व्यवसाय काही दिवस बंद पडण्याची शक्यता आहे.

शहरात येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाची तपासणी दस्तुरी येथे होत असल्याने पर्यटक नाराज होऊन पुन्हा माघारी देखील पडताना दिसत आहेत. याबाबत माथेरान हॉटेल असोसिएशनकडून हॉटेल व्यावसायिक अजय सावंत यांनी निवडणूक आयोगाने पर्यटकांवर वाहने न तपासता स्थानिकांची वाहने टॅक्सी तपासूनच पुढे पाठवावी अशी सूचना केली आहे.



> आमच्या गावात पर्यटक आले तर आम्हाला रोजगार मिळेल. पर्यटकांची वाहने तपासली जात असल्याने अनेक पर्यटक दस्तुरी येथून माघारी फिरत आहेत. त्यामुळे रोजगार हिरवला जाण्याची शक्यता आहे. शहर हे पर्यटनावर अवलंबून असल्याने असे प्रकार घडल्यास पर्यटक येणार नाहीत आणि चुकीचा मेसेज पर्यटन क्षेत्रात पसरला जाईल. त्यामुळे निवडणूक यंत्रणेने त्यावर सकारात्मक निर्णय घ्यावा .
>
> **- रेखा चौधरी, हॉटेल व्यावसायिक**

## उरण तालुका पत्रकार संघाची सभा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुका दैनिक पत्रकार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवारी (दि.१७) नोव्हेबर रोजी उरण येथील शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. यावेळी जगदीश तांडेल यांची अध्यक्षपदी तर मधुकर ठाकूर यांची सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली. दरम्यान, पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांचा मावळते अध्यक्ष जीवन केणी, मावळते सचिव दत्तात्रेय म्हात्रे यांच्यासह उपस्थित पत्रकारांचा सत्कार करण्यात आला तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी अध्यक्ष पदासाठी जगदीश तांडेल व सचिव पदासाठी मधुकर ठाकूर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपाध्यक्ष पदी दिनेश पवार यांची फेरनिवड करण्यात आली. यामध्ये कार्यकारणी सदस्य म्हणून जीवन केणी, दत्तात्रेय म्हात्रे, प्रदीप पाटील, सुनील ठाकूर, मनोज पाटील यांची निवड करण्यात आली आहे.





● मुरूड-भालगाव-रोहा रस्त्यावर खाडी असल्याने परिसर निसर्गरम्य आहे. कोळी बांधव शांत समुद्रात जाळी टाकून मासेमारी करताना. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## तळा ज्युनियर कॉलेजचे समाजसेवा शिबीर

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे निवासी समाजसेवा शिबीर १५ व १६ नोव्हेंबर रोजी टोकेखार येथे पार पडले. १५ नोव्हेंबर रोजी टोकेखारचे अध्यक्ष जनार्दन माळी व पोलीस पाटील कृष्णा माळी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गावातील रस्ते, शाळा, मंदिर, मैदान व परिसराची स्वच्छता केली. सायंकाळी पुन्हा स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. दरम्यान मिठागर शाळेचे मुख्याध्यापक संजय पवार आणि विनोद पवार यांनी शिबिराला भेट देऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

सायंकाळच्या सत्रात मुरूडचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी स्पर्धा परीक्षांमधील करिअरच्या संधी या विषयावर मार्गदर्शन केले. रात्री विद्यार्थ्यांच्या कला गुणांना मंच मिळावा यासाठी गीतगायन, नृत्य, भजन, नाटक आदी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी तळा ज्युनियर कॉलेज व राजिप शाळा टोकेखारच्या विद्यार्थ्यांनी सर्वांची मने जिंकली. १६ नोव्हेंबर रोजी पुन्हा स्वच्छता उपक्रम राबवण्यात आले. दुपारी समारोप कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी टोकेखारचे अध्यक्ष जनार्दन माळी, पोलीस पाटील कृष्णा माळी, मनोहर माळी, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप ढाकणे, प्रा पाटील एन. सी., शिबीर प्रमुख प्रा जमादार एस.टी. प्रा सर्जे व्ही बी, शिक्षक व गावातील मान्यवर उपस्थित होते.

## प्रा. स्नेहल कांबळे यांना पीएचडी

**। खरोशी । वार्ताहर ।**



पेण एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेत भाऊसाहेब नेने महाविद्यालय येथे कार्यरत असलेले प्राचार्य डॉ. सदानंद भास्कर धारप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. स्नेहल सुशील कांबळे हिने मुंबई विद्यापीठाची रसायनशास्त्र विषयातील उच्चतम पदवी विद्यावाचस्पती पीएचडी मिळविली आहे. तिने महाविद्यालय पेण येथे गेले दहा वर्षांपासून रसायनशास्त्र विषयातील संशोधन केंद्र सुरू आहे. सदरचे संशोधन केंद्र हे तत्कालीन अध्यक्ष ॲड. बापुसाहेब नेने व त्यांचे सहकारी यांचे प्रेरणेने सुरू झाले. या विद्यार्थ्यीनीचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले, तसेच पुढील काळात असेच यश मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या यशात रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक, महाविद्यालयांतील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय प्रमुख, पेण एज्युकेशन संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी, प्र.कुलगुरु डॉ. अजय भामरे यांचेही सहकार्य लाभले.

## तरुण बेपत्ता

**पनवेल :** मार्केटमध्ये कामासाठी लागणारे कपडे घेऊन येतो असे सांगून आसुडगाव येथून घराबाहेर पडलेला २० वर्षीय तरुण परत घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार खान्देश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रवींद्र मुन्नालाल रजक असे या तरुणाचे नाव असून त्याची उंची ५ फूट, रंग सावळा, चेहरा गोल, नाक सरळ, डोळे मध्यम, केस काळे वाढलेले, अंगाने मध्यम तसेच अंगात लाल रंगाची टीशर्ट काळी पॅन्ट घातलेली आहे. सदर तरुणाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पोलीस हवालदार हिरालाल शेलार किंवा खान्देश्वर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## एसटीईएम दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन

**। खांब । प्रतिनिधी ।**

दीपक नायट्राईट कंपनी धाटाव व दीपक फाऊंडेशन आणि ॲड. मनोजकुमार शिंदे फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने नगर परिषद शाळा क्र. १० येथे राष्ट्रीय एसटीईएम दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

या प्रदर्शनात नगर परिषद शाळा क्र. १, ९, १० तसेच डॉ. सी. डी. देशमुख माध्यमिक विद्यालयातील एकूण चार शाळांमधील १२९ विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्वक सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांनी एकूण ६२ विज्ञान मॉडेल्स तयार करून त्यांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. विविध प्रयोग, नवकल्पना आणि तांत्रिक मॉडेल्समुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्रभावीपणे अधोरेखित झाले आहे.

विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित एसटीईएम विषयांबद्दल जिज्ञासा, प्रयोगशीलता, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे असल्याचे आयोजकांकून सांगण्यात आले आहे. विज्ञान प्रदर्शनाचे आयोजना बद्दल सर्वांचे आभार मान्यात आले.



**रविवारी प्रवास वाटतोय नकोसा | प्रवाशांकडून संतप्त प्रतिक्रिया**

## कोलाड-खांब मार्गावर प्रवाशांचा खोळंबा

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

थंडीचा मोसम सुरु झाला असुन सलग शनिवार रविवार सुट्टी असल्यामुळे या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी असंख्य पर्यटक कोकणात येतात आणि सर्व सुट्टीचा आनंद लुटून रविवारी परतीच्या प्रवासाला निघतात. परंतु, या परतीच्या प्रवासात कोलाड खांब येथील अपूर्ण रस्त्यामुळे रात्री उशिरा पर्यत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

लांबच लांब रांगामुळे प्रवासी वर्गाला वाहतूक कोंडीचा मोठा सामना करावा लागला आहे. वाहतूक कोंडीचा तिढा सुटता नसल्यामुळे रविवार दिवस नकोसा झाला आहे. यामुळे प्रवाशी वर्गातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



शनिवार दि.१५ व रविवार दि.१६ नोव्हेंबर रोजी सलग दोन दिवस सुट्टी असल्यामुळे मुंबई, ठाणे, पुणे येथून असंख्य पर्यटक कोकणातील पर्यटन स्थळे, समुद्र किनारे, गडकिल्ले येथे पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी कुटुंब, मित्रपरिवारासोबत आले होते.

सर्व सुट्टीचा आनंद घेत असंख्य पर्यटक एसटी बस, खासगी बस, फोरव्हीलर, व इतर वाहनाने परतीच्या प्रवासाला निघाले. परंतु, परतीच्या प्रवासाला निघालेल्या पर्यटकांना कोलाड खांब येथील अपूर्ण रस्त्यामुळे वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. खांब कोलाड येथील अपूर्ण रस्ता हा प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत आहे. कोलाड मार्गावर रविवारी रात्री ८ वाजता येथे ३ ते ४ किलोमीटरवर लांबच लांब रांगा लागल्या होत्या. कोलाड पोलिसांच्या प्रयत्नाने वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शर्थिचे प्रयत्न केले. तरी वाहतूक कोंडीचा प्रश्न केव्हा सुटणार अशी प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे. कोकणामध्ये जाताना डोकेदुखी ठरणारा मुंबई- गोवा मार्ग केव्हा पूर्ण होणार या प्रतिक्षेमध्ये कोकणवासीय आहेत. अखेर येत्या २०२६ मध्ये तरी या महामार्गाचे काम तरी पूर्ण होणार का ? असा प्रश्न सध्या कोकणवासीय राजकीय नेत्यांना विचारत आहेत.

### १८ वर्षांपासून काम सुरु

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील चौपदरी करणाचे काम गेली १८ वर्षांपासून सुरु असुन अद्याप हे काम पूर्ण होई ना? या महामार्गाचे काम लोकसभा व विधानसभा मतदानपूर्वी जोरदार सुरु होते. परंतु मतदाना नंतर हे काम मंदावले आहे. हे चित्र फक्त मतदानापुरते मर्यादीत होते असे भासविण्यात आले.**

## उपविभागीय अधिकारी, रोहा उपविभाग, रोहा यांच्या न्यायालयात
## जाहीर नोटीस

सुनावणीची नोटीस आरटीएस विलंबमाफी क्र. १०६/२०२५

१. परशुराम मुरलीधर सोमण
रा. ३३ अ, समर्थनगर, एम.आय.डी.सी.सातारा, अपिलार्थी
ता.जि.सातारा तर्फे अखत्यार
श्री. जगदिश आनंदराव वाडकर
रा. चिंचवड, पुणे ४११०१९

विरूद्ध

१. मनिषा दत्तात्रय सोमण
२. निलेश दत्तात्रय सोमण
१ व २ दोघेही रा. पुसाटीआळी, पो.तळा,जि. रायगड
३. सम्राज्ञी श्रीकांत जोशी उत्तरार्थी
रा. न्यू श्रीमंगल अपार्टमेंट, खेडरोड
डोंबिवली, पूर्व पहिला मजला, मुंबई ४२१ २०१
४. त्रिंबक दत्तात्रय सोमण
रा.एस.बी.रूम नं.१०१, बाबूशेट स्मृती
को.हौ.सोसा.लि.देवनार गोवंडी,
पूर्व प्लॉट न. २५६, काचकंपनीजवळ गोवंडी,
पूर्व मुंबई ४०००८८

सर्व संबंधितांस या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अन्वये मौजे वाली, ता. रोहा येथील ग.नं. ३०३, या मिळकतीबाबत दाखल फेरफार क्र. ४१८ च्या विरोधात अपील दाखल केले आहे.

सबब, या जाहीर नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तरी संबंधितांनी दिनांक २७/११/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वतः अथवा वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमुद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

दि. १३/११/२०२५

Signed by
Dnyaneshwar S Khutwad
Date: 17-11-2025 11:48:37
**उपविभागीय अधिकारी**
**रोहा विभाग रोहा**

---

जा.क्र. न्यायशाखा २५१८/२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, अलिबाग,
''कल्पतरू'' इमारत मुख्य पोस्ट ऑफिस जवळ,
ता. अलिबाग, जि. रायगड.
दिनांक १४/११/२०२५

### चौकशीची जाहीर नोटीस

बदल अर्ज क्र.७१३/२०२५
सार्वजनिक न्यासाचे नाव-''कामथ ग्रामस्थ मंडळ कामथ, पो. किहीम, ता. अलिबाग, जि.रायगड''
मु. कामथ, पो. किहीम, ता. अलिबाग, जि.रायगड,
पिन क्र. ४०२२०१
ट्रस्ट नोंदणी क्रमांक-एफ १६०६५/२०२४ (रायगड)
अर्जदार-श्री. संजय दत्तात्रय पुरव

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड हे वर नमूद केलेल्या अर्जा संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.
खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
खालील मालमत्ता (जमिन मिळकत) न्यासाचे रेकॉर्डवर घेण्यात यावी -
१) स्थावर मिळकत (वर्णन)- मौजे. चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जमिन मिळकत

| अ. क्र. | स्थावर मिळकत वर्णन | क्षेत्र हे.आर. | आकार (रू.पै.) | किंमत(लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे चोंढी गट क्र. व उपविभाग (स.नं./हि.नं.) १७१ | एकूण ०-०४-०० | ०.३८ | १२ लाख |

चतु:सिमा :
पुर्वेस : गट नं. १७३ श्री. गौरव सुरेश गांधी
पश्चिमेस : गट नं. १७० श्रीमती रूक्मिणी पांडुरंग काठे
दक्षिणेस : मौजे आगरसुरेची शीव
उत्तरेस : गट नं. १७२ श्री. गौरव सुरेश गांधी

२) स्थावर मिळकत (वर्णन)- मौजे. कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जमिन मिळकत

| अ. क्र. | स्थावर मिळकत वर्णन | क्षेत्र हे.आर. | आकार (रू.पै.) | किंमत(लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे. कामथ गट क्र. व उपविभाग (स.नं./हि.नं.) १९४ | एकूण ०-०६-३० | १.२५ | १८.९० लाख |

चतुः सिमा :
पुर्वेस : रस्ता
पश्चिमेस : गट नं. १९१/अ श्री. अरविंद नारायण काठे व इतर
दक्षिणेस : गट नं. १९१/अ श्री. अरविंद नारायण काठे व इतर
उत्तरेस : गट नं. १८६ श्री. अनिल वल्लभदास अग्रवाल

३) स्थावर मिळकत (वर्णन)- मौजे. कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जमिन मिळकत

| अ. क्र. | स्थावर मिळकत वर्णन | क्षेत्र हे.आर. | आकार (रू.पै.) | किंमत(लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे.कामथ गट क्र. व उपविभाग (स.नं./हि.नं.) २५५ | एकूण ०-०७-८० | १.६९ | २३.४० लाख |

चतु:सिमा :
पुर्वेस : गट नं. २५३ श्री. रमेश दामोदर काठे व इतर
पश्चिमेस : गावठाण
दक्षिणेस : गट नं.२५२, गट नं.२५६/अ श्री.शा.ल.काठे व इतर, श्री.बा.का. पाटील
उत्तरेस : गट नं. २५४ श्रीमती सुषमा सुधाकर म्हात्रे

४) स्थावर मिळकत (वर्णन)- मौजे. कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जमिन मिळकत

| अ. क्र. | स्थावर मिळकत वर्णन | क्षेत्र हे.आर. | आकार (रू.पै.) | किंमत(लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे.कामथ गट क्र.व उपविभाग (स.नं./हि.नं.) २७२ | एकूण ०-०३-३० | ०.५६ | ९.९० लाख |

चतु:सिमा :
पुर्वेस : श्री. राशेज शंकर काठे
पश्चिमेस : श्री विश्वजीत विनायक काठे व इतर
दक्षिणेस : श्री. विश्वजीत विनायक काठे व इतर
उत्तरेस : श्री. दयाराम गोविंद काठे

५) स्थावर मिळकत (वर्णन)- मौजे. कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जमिन मिळकत

| अ. क्र. | स्थावर मिळकत वर्णन | क्षेत्र हे.आर. | आकार (रू.पै.) | किंमत(लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे.कामथ गट क्र.व उपविभाग (स.नं./हि.नं.) ५०२ | एकूण ०-०३-३० | ०.५१ | ९.९० लाख |

चतु:सिमा :
पुर्वेस : गट नं. १८० श्री. अंशल अनिल अग्रवाल
पश्चिमेस : गट नं. १८३ श्री. शशांक रमाकांत पाटील व इतर
दक्षिणेस : गट नं. १७८ व गट नं. १७७ श्री. वि. ग. पाटील व इतर, श्री. र. दा. काठे व इतर
उत्तरेस : गट नं. १८२ श्री. मोनाझ नोवल

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर लेखी पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखे पासून ३० दिवसांचे आंत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १४/११/२०२५ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड विभाग, रायगड**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक दिलीप किसन भासे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४३ | २ | एकुण क्षेत्र ०-६४-०० पैकी विकत देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-१६-०० | ०-५९ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १७/११/२०२५

**ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि.रायगड)**

ज.म. र अर्ज ३८२/२०२५

## जाहिर नोटीस

प्रति,
श्रीम. समिरा शौकत नाईक (विवाहापुर्वीचे नाव) अर्जदार
श्रीम. समिरा हसन कादीरी,
रा. बोर्ली, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत मजगाव,
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. १४/०८/१९७३ रोजी मौजे मजगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मजगाव, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. १४/०८/१९७३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणा-या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.
आज ता. ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे. सही/-

**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

दिनांक : १८ नोव्हेंबर २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे अंत्राट तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| सदानंद पालू करडे<br>खंडू पालू करडे<br>ज्ञानेश्वर पालू करडे | २६ | ५ | ०-२३-०० | ०-२० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक : १८/११/२०२५
मो. नं. ९१५८२७७७२८

---

### TENDER NOTICE

A Tender was invited dated 27/10/2025 for the work of "Expansion Joint Waterproofing Treatment" of Delta Central CHS Ltd., Plot No.4, Sector-23, Kharghar-410210. The same has been closed and the tender is being re invited as per the following schedule.

Tender Forms are available at Society Office from 19/11/2025 To 28/11/2025 upto 17.00 Hrs.

Last date for the submission: 07/12/2025 up to 15.00 Hrs. Tender should be submitted at Society Office Only.

Those who have already submitted the tender, they need not apply again and will be considered for the current tender. However, if they want to revise the submission, the same is permitted.

Tender Price: Rs.1,180/- (Nonrefundable)

**Issued By**
**Chairman/Secretary**
**DCCHSL**

---

## जाहीर नोटीस

तमाम सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती ह्या मुळ मालकांकडुन विविध नोंदणीकृत खरेदीखतान्वये खरेदी केलेल्या आहेत. सदर मिळकतीमधील व तिचे कुठल्याही भागातील त्यांचे सर्व हक्क व अधिकार निर्वेध निजोखमी व बोजारहित असल्याची व त्याबाबतचे पणनहक्क व अधिकार तपासण्याकामी सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

विद्यमान मालकांनी केलेल्या सुचनेवरून विद्यमान मालकांचे सदर मिळतीबाबतचे मालकी हक्क/स्वामित्व तपासणीसाठी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी, सदरील मिळकतीत किंवा त्यांचे भागात कोणाचेही कसलेही हक्क अगर हितसंबंध, वा दान, गहाण, साठेखत, अदलाबदल, लीज, लीन, बक्षीस, अन्नवस्त्रपोटगी, चोळी, बांगडी, कोर्ट, कब्जा, अथवा अन्य कुठल्याही प्रकारचे हक्क व हितसंबध असल्यास त्यांनी तसे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आपल्या कथित हक्काबाबत खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावी व त्या संबंधीच्या सर्व अस्सल कागद पत्रानिशी समक्ष येऊन त्याबाबत आमची खात्री पटवुन द्यावी. जर या मुदतीत अशी कुठलीही हरकत आली नाही, तर सदरील मिळकतीत कुणाचेही कसलेही हक्क व हितसंबंध नाहीत व असल्यास ते त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत असे समजण्यात येतील.

**परिशिष्ट**

अ) -मिळकतीचे वर्णन - तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, जिल्हा रायगड मे. दुय्यम निबंधक कर्जत यांचे कार्यकक्षेतील व जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती कर्जत यांचे हद्दीतील, ग्रामपंचायत गाव मौजे मोग्रज येथील मिळकत सर्व्हे नं.१, हिस्सा नं.- ४, यांसी एकुण क्षेत्र ०५ हेक्टर २१ आर पैकी ०२ हेक्टर ४० आर हि मिळकत त्यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-
पुर्वेस :- मौजे मोग्रज स. नं. ८४ पैकी मिळकत
दक्षिणेस :-मौजे मोग्रज स. नं. १ आणि स. नं. २ पैकी मिळकत
पश्चिमेस :- मौजे मोग्रज स. नं. १ पैकी मिळकत
उत्तरेस :- मौजे मोग्रज स. नं. १ पैकी मिळकत

ब)-मिळकतीचे वर्णन तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, जिल्हा रायगड मे. दुय्यम निबंधक कर्जत यांचे कार्यकक्षेतील व जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती कर्जत यांचे हद्दीतील, ग्रामपंचायत गाव मौजे मोग्रज येथील मिळकत सर्व्हे नं. ६७, हिस्सा नं. - १ यांसी एकुण क्षेत्र ०० हेक्टर ९९ आर हि संपुर्ण मिळकत त्यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-
पुर्वेसः - मौजे मोग्रज स. नं. ७३ पैकी मिळकत
दक्षिणेस:- मौजे मोग्रज स. नं. ८५ पैकी मिळकत
पश्चिमेस :- मौजे मोग्रज स. नं. ६७ पैकी मिळकत
उत्तरेस:- मौजे मोग्रज स. नं. ७१ आणि ७२ पैकी मिळकत

क)-मिळकतीचे वर्णन- तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, जिल्हा रायगड मे. दुय्यम निबंधक कर्जत यांचे कार्यकक्षेतील व जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती कर्जत यांचे हद्दीतील, ग्रामपंचायत गाव मौजे मोग्रज येथील मिळकत सर्व्हे नं. ६७, हिस्सा नं.३ यांसी एकुण क्षेत्र ०२ हेक्टर २८ आर हि संपुर्ण मिळकत त्यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-
पुर्वेस :- मौजे मोग्रज स. नं. ६७ पैकी मिळकत
दक्षिणेस:- मौजे मोग्रज स. नं. ८५ पैकी मिळकत
पश्चिमेसः मौजे मोग्रज स. नं. ६७ पैकी मिळकत
उत्तरेस :- मौजे मोग्रज स. नं. ६७ पैकी मिळकत

ड)-मिळकतीचे वर्णन तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, जिल्हा रायगड मे. दुय्यम निबंधक कर्जत यांचे कार्यकक्षेतील व जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती कर्जत यांचे हद्दीतील, ग्रामपंचायत गाव मौजे मोग्रज येथील मिळकत सर्व्हे नं. ८५, हिस्सा नं.१ यांसी एकुण क्षेत्र ०८ हेक्टर १२ आर पैकी ०८ हेक्टर ०० आर हि मिळकत त्यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-
पुर्वेस :- मौजे मोग्रज स. नं. ८४ पैकी मिळकत
दक्षिणेस :- मौजे मोग्रज स. नं. ८७ पैकी मिळकत
पश्चिमेस:- नदी
उत्तरेस:- मौजे मोग्रज स. नं. ६७ पैकी मिळकत

इ)-मिळकतीचे वर्णन- तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, जिल्हा रायगड मे. दुय्यम निबंधक कर्जत यांचे कार्यकक्षेतील व जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती कर्जत यांचे हद्दीतील, ग्रामपंचायत गाव मौजे मोग्रज येथील मिळकत सर्व्हे नं. ३, हिस्सा नं. - ३/ब/३ यांसी एकुण क्षेत्र ०१ हेक्टर ४२.६० आर हि संपुर्ण मिळकत त्यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-
पुर्वेस :- मौजे मोग्रज स. नं. ३ पैकी मिळकत
दक्षिणेसः रस्ता
पश्चिमेस :- मौजे मोग्रज स. नं. ८४ पैकी मिळकत
उत्तरेस :- मौजे मोग्रज स. नं. ७७ पैकी मिळकत

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

दि. १८/११/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता.कर्जत, जि.रायगड-४१०१०१.

---

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार भूखंड इरादित करण्यात आलेला आहे. सदर इरादापत्र श्री. पांडुरंग गणपत पाटील यांच्या नावे असून, एकाच नावाच्या दोन व्यक्ती असल्याचे निर्दशनास आले आहे. सदर इरादापत्र श्री. ओम किशोर पाटील यांनी स्विकारले आहे. सदर इरादापत्र या कार्यालयाकडे सादर करण्याकरीता त्यांना दि. २९.१०.२०२५ रोजी पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. परंतु अदयाप त्यांनी इरादापत्र सादर केलेले नाही. श्री. महादेव हाशा मढवी यांचे वारसांचा खुलासा प्राप्त करण्याचे प्रस्तावित आहे. सदर इरादापत्रामधील भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे :

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. व हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | इरादित भूखंडाची माहिती | इरादापत्रावरील भूधारकाचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | भेंडखळ/ २२८१ | ५३(२)/ ८३ | २४८ (९B) | ०-०४-० | एकूण संपादित क्षेत्र ०-९३-१ हे.आर. असून पात्रता ८१४.६२५ चौ.मी. पुर्णांकात ८०० चौ.मी. पैकी १०० चौ.मी. बांधकामाकरीता राखीव ठेवून ७०० चौ.मी. इरादित | मौजे द्रोणागिरी येथील भुखंड क्र. २०५, सेक्टर-६५, क्षेत्र-८०० चौ.मी. | श्री. पांडुरंग गणपत पाटील | श्री. पांडुरंग गणपत पाटील हे मयत असून त्यांचे खरे वारस कोण आहेत याबाबत संदिग्धता आहे. सबब **सिडको/भूमी/साटयो/द्रोणागिरी/ २२८१/ २०२५/६२७९, दि.२६.०६.२०२५** रोजीचे निर्गमित करण्यात आलेले इरादापत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ०२. | भेंडखळ/ २२८१ | III/ ५३-८२ | २५४/३<br>२७१/१७<br>२८४/२<br>२६३/२ | ०-४-०<br>०-४-०<br>०-२-३<br>०-४-३ | | | | |
| ०३. | भेंडखळ/ २२८१ | III १३-८३ | २४२/६<br>२४३/१०<br>२६९/८<br>२७३/१<br>२८७/१<br>२८७/७<br>२९६/९<br>३०२/६<br>३०३/७<br>३०७/६<br>३१०/८ | ०-२-३<br>०-१०-२<br>०-९-७<br>०-१६-५<br>०-०३-५<br>०-०२-०<br>०-००-८<br>०-०८-०<br>०-०८-०<br>०-०५-८<br>०-१०-० | | | | |

उपरोक्त नमुद भूखंडाचे इरादापत्र हे दि. २६.०६.२०२५ रोजीचे श्री. पांडुरंग गणपत पाटील यांच्या नावाचे असून, श्री. ओम किशोर पाटील यांनी मी श्री. पांडुरंग गणपत पाटील यांचा वारस असल्याचे कागदपत्रे सादर करून श्री. ओम किशोर पाटील यांनी कागदपत्राच्या आधारे इरादापत्र घेतल्याचे हरकत दाखल केली असून श्री. रमेश पांडुरंग पाटील व इतर यांनी दि. २३.०९.२०२५ रोजीच्या पत्रानुसार हरकत घेवून पांडुरंग गणपत पाटील असे नाव साधर्म्य असलेल्या दोन व्यक्ती असून त्यातील एक भेंडखळ गावातील असून, दुसरी बोकडविरा गावातील आहे. परंतु दोघांचेही ॲवार्ड कॉपी एकाच संचिकेमध्ये असल्यामुळे सदरचे इरादापत्र बोकडविरा गावातील पांडुरंग गणपत पाटील यांच्या वारसांनी म्हणजेच श्री. ओम किशोर पाटील यांनी घेवून गेल्याचे समजले आहे. श्री. ओम किशोर पाटील यांना दि. २९.१०.२०२५ रोजीच्या पत्राने सदर इरादापत्र भूमी (१२.५%) या विभागात जमा करण्याबाबत कळविले आहे. परंतु अदयापपर्यंत त्यांनी इरादापत्र सादर केलेले नाही.

श्री. पांडुरंग गणपत पाटील यांच्या कायदेशीर वारसांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत कायदेशिर वारस असल्याबाबतची न्यायालयीन कागदपत्रांसह जबाब देण्यास भूमी (१२.५%) या विभागात हजर राहावे. पुढील कायदेशीर गुंतागुंत टाळण्यासाठी **सिडको/भूमी/साटयो/द्रोणागिरी/२२८१/२०२५/६२७९, दि. :२६.०६.२०२५** रोजीचे इरादापत्र या जाहीर सूचनेद्वारे रद्द करण्यात येत आहे.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण:–** मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**सिडको/जनसंपर्क/३४८/२०२५-२६**

---

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे कामथ, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री.पवन जगदीश मुलकीकर, राहणार किहीम-कामथ, ता.अलिबाग सदर मिळकत ही यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. पवन जगदीश मुलकीकर, यांच्या मालकी हक्काचा तपास करून, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदापेत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| कामथ ता.अलिबाग | ३०३ | ०-१०-७० एकूण | २-७० |

अलिबाग सही/-
दिनांक : १७/११/२०२५

**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | प्लॉट नं. | क्षेत्र चौरस मिटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| प्रभाकर विष्णु लढे | ९० | १८ | २२४.०० | २२ | ४० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.२, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०१०१

सही/ -
**ॲड.नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :- १८/११/२०२५
मो. नं. ९३७२९६४६६५

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| हाशिवरे ता.अलिबाग, जि.रायगड | ३४०/२ | एकुण ०७.२९.०० | ०.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध ताबाकब्जा भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य दस्त कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी ह्या नोटीसीच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुरव्यासह त्यांच्या लेखी हरकती दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतेही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भात नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येण्याऱ्या कोणत्याही हरकतीस माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

अलिबाग. सही/-
दिनांक : १७/११/२०२५

**ॲड.अमर अशोक घरत**
मु.पो.थळ, पेठ नाका,
ता.अलिबाग, जि.रायगड

---

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# टीम इंडियाचा लाजिरवाणा पराभव!






**। कोलकाता । वृत्तसंस्था ।**

कोलकात्यातील ईडन गार्डन्सच्या मैदानावर पार पडलेल्या पहिल्या कसोटी सामन्याचा शेवट असा होईल, असा कोणी विचारही केला नसेल. या सामन्याचा निकाल अवघ्या अडीच दिवसात लागला. पुन्हा एकदा भारतीय फलंदाज मायदेशात खेळताना फिरकी गोलंदाजांविरूद्ध संघर्ष करताना दिसून आले. भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १२४ धावा करायच्या होत्या. एकापेक्षा एक स्टार फलंदाज असलेल्या भारतीय फलंदाजीक्रमासाठी हे आव्हान फार नव्हतं. पण भारतीय संघाचा संपूर्ण डाव अवघ्या ३५ षटकात ९३ धावांवर आटोपला.

या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव अवघ्या १५९ धावा संपुष्टात आला. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाला अवघ्या १८९ धावा करता आल्या. यासह भारतीय संघाने पहिल्या डावात अवघ्या ३० धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेचे सुरूवातीचे ७ फलंदाज स्वस्तात माघारी परतले होते. पण त्यानंतर कॉर्बिन बॉश आणि तेंबा बावुमा यांनी मिळून संघाची धावसंख्या १५३ धावांवर पोहोचवली. भारताला हा सामना जिंकण्यासाठी १२४ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाचा डाव ९३ धावांवर आटोपला. यासह दक्षिण आफ्रिकेने हा सामना ३० धावांनी आपल्या नावावर केला.

## सायमन हार्मर ठरला विजयाचा हिरो

दक्षिण आफ्रिकेचा फिरकीपटू सायमन हार्मर दोन्ही डावात भारतीय फलंदाजांवर भारी पडला. दोन्ही डावात मिळून त्याने ८ गडी बाद केले. यासह सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना जसप्रीत बुमराहने पहिल्या डावात सर्वाधि ५ गडी बाद केले होते. तर दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना रवींद्र जडेजाने सर्वाधिक ४ गडी बाद केले. दोन्ही संघातील गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली, पण फलंदाजांना हवं तितकं योगदान देता आलं नाही.



## भारतात २१ वर्षांनंतर पहिल्यांदाच असं घडलं

या सामन्यातील ४ डावात मिळून अवघ्या ५९४ धावा बनल्या. ही भारतात कसोटी क्रिकेट खेळताना संयुक्तरित्या सर्वात कमी धावसंख्या आहे. याआधी २००४ मध्ये वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यात चारही डावात मिळून ६०४ धावा बनवल्या गेल्या होत्या. त्यावेळी भारत आणि ऑस्ट्रेलिया हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्याचा निकाल अवघ्या तिसऱ्या दिवशी लागला होता. पण भारतीय संघाने या सामन्यात ऑस्ट्रेलियावर १३ धावांनी विजय मिळवला होता.

जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# सिद्धिप्रभा, गुड मॉर्निंग स्पोर्टस् विजेते





**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

सिद्धिप्रभा फाऊंडेशन, गुड मॉर्निंग स्पोर्टस् यांनी कुमार गटात मुंबई शहर कबड्डी असोसिएशनने आयोजित केलेल्या निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत कुमार गटात अनुक्रमे पश्चिम व पूर्व विभागात विजेतेपद पटकाविले.

मुंबईतील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर सुरु असलेल्या पश्चिम विभागातील कुमारांच्या अंतिम सामन्यात सिद्धिप्रभा फाऊंडेशनने विजय क्लबला ३९-२६ असा पराभव करीत स्व. सौ. द्रौपदी मारूती जाधव चषक पहिल्यांदा आपल्या नावे केला. आक्रमक सुरुवात करीत सिद्धीप्रभाने विश्रांतीला २०-११ अशी आघाडी घेत विजयाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. विश्रांतीनंतर आपला खेळ कायम ठेवत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. सिद्धार्थ भोसले, आदित्य इंगळे यांच्या चढाई पकडीच्या चौफेर खेळाला या विजयाचे श्रेय जाते. शिवम यादव, आर्यन यांचा खेळ विजय क्लबला मिळवून देण्यात कमी पडला.

पूर्व विभागात कुमारांच्या अंतिम सामन्यात गुड मॉर्निंग स्पोर्टस् ने पूर्वार्धातील पिछाडीवरुन साऊथ कॅनराचा प्रतिकार ४६-२८ असा मोडून काढत स्व. सौ. द्रौपदी मारूती जाधव चषक आपल्याकडे खेचून आणला. पूर्वार्धात साऊथ कॅनराच्या चिराग लिमकर, अभिजित चव्हाण यांनी उत्कृष्ट खेळ करीत संघाला २ गुणांची आघाडी दिली होती. पण उत्तरार्धात दिनेश गवळी, श्रवण तिरोडकर यांनी चढाई पकडीचा तुफानी खेळ करीत संघाला १८ गुणांच्या फरकाने विजेतेपद मिळवून दिले.

पूर्व विभागात किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात शताब्दी स्पोर्टस्ने पहिल्या डावातील १८-२४ अशा ६ गुणांच्या पिछाडीवरून श्री स्वामी समर्थ मंडळाचे आव्हान ५८-३७ असे परतवीत जेते पदावर आपले नाव कोरले. दुसऱ्या डावात सूर सापडलेल्या रूपाली साव, विनया वाळुंज यांनी झंझावाती चढाया करीत हा विजय मिळविला. त्यांना शालू यादव हिची पकडीची उत्तम साथ लाभली. अनन्या शिंदे, कस्तुरी कोकाटे, नियती खाबे यांनी पहिल्या डावात उत्कृष्ट खेळ करीत संघाला आघाडी दिली होती. दुसऱ्या डावात मात्र त्यांचा खेळ ढेपाळला. पश्चिम विभागाच्या किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात अमरहिंद मंडळाने भारतमाताचा पराभव करीत विजेतेपद पटकविले. साईजा पेडणेकर, वेदिका तिलोटकर यांच्या चतुरस्त्र खेळाने अमरहिंदने विश्रांतीला भक्कम आघाडी घेतली होती. विश्रांतीनंतर भारतमाताच्या पायला कांचन, तन्वी काणेकर यांनी जोशपूर्ण खेळ करीत सामना रंगतदार अवस्थेत नेला. पण संघाला जेतेपद मिळवून देण्यात त्या कमी पडल्या.

# निवडक

## सिनेर सलग दुसऱ्यांदा विजेता

इटली : इटलीच्या जॅनिक सिन्नरने एटीपी फायनल्स स्पर्धेचे विजेतेपद जिंकले आहे. त्याने सलग दुसऱ्यांदा हे विजेतेपद पटकावले आहे. रविवारी ट्यूरिन येथे खेळल्या गेलेल्या विजेतेपदाच्या सामन्यात सिन्नरने जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा खेळाडू कार्लोस अल्काराजचा ७-६, ७-५ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. या हंगामात दोन्ही खेळाडूंमधील ही आणखी एक हाय-प्रोफाइल लढत होती, जी सिनेरने जिंकली. सिनेरने यापूर्वी विम्बल्डन २०२५ च्या अंतिम फेरीत अल्काराजला हरवले होते.या हंगामात दोन्ही खेळाडू तीन ग्रँड स्लॅम फायनलमध्ये एकमेकांसमोर आले. अल्काराजने पाचव्या सेटच्या टायब्रेकरमध्ये फ्रेंच ओपन जिंकले. त्यानंतर सिनेरने विम्बल्डन फायनल जिंकून बदला घेतला. तथापि, अल्काराजने पुन्हा एकदा यूएस ओपन फायनल जिंकली. सिनेरने यावर्षी ऑस्ट्रेलियन ओपनही जिंकले. २६ जानेवारी रोजी त्याने मेलबर्नमधील रॉड लेव्हर अरेना येथे जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हचा सरळ सेटमध्ये ६-३, ७-६ (७-४), ६-३ असा पराभव केला. यामुळे तो सलग दुसऱ्यांदा ऑस्ट्रेलियन ओपन विजेता बनला. ही ग्रँड स्लॅम स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी स्पर्धा मानली जाते.

## हरिकृष्णाचा टायब्रेकमध्ये पराभव

**पणजी** : फिडे विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत हिंदुस्थानचा प्रवास आता फक्त दुसऱ्या क्रमांकाच्या ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगॅसीवर अवलंबून राहिला आहे. अनुभवी ग्रॅण्डमास्टर पेंटाला हरिकृष्णाला पाचव्या फेरीतील टायब्रेकमध्ये पेरूचा ग्रॅण्डमास्टर जोसे एडुआर्डो मार्टिनेज अल्कान्ताराकडून पराभव स्वीकारावा लागला आणि त्याचा प्रवास येथेच थांबला. अर्जुनने दोन वेळचा विजेता ग्रॅण्डमास्टर लेव्हॉन अरोनियनला दोन डावांत १.५-०.५ ने पराभूत करत उपांत्यपूर्व फेरीत दमदार प्रवेश केला होता. दुसरीकडे, हरिकृष्णाचे मार्टिनेजविरुद्धचे पहिले दोन सामने अनिर्णित राहिल्याने टायब्रेकमध्ये त्याला कठीण आव्हानाला सामोरे जावे लागले.पहिल्या दोन रॅपिड सामन्यांत दोघांनी बरोबरी साधली. त्यानंतरच्या १० मिनिटांच्या रॅपिड सामन्यात हरिकृष्णाने पांढऱ्या मोहऱ्यांनी आक्रमक सुरुवात केली आणि १४ चालींनंतर उत्कृष्ट तयारीच्या जोरावर घड्याळावर जवळपास एक मिनिटाची आघाडीही मिळवली. मात्र मार्टिनेजने अचूक बचाव करत मध्यातून खेळावर पकड मजबूत केली. राणीची अदलाबदल झाल्यानंतर स्थिती अधिक अवघड बनली आणि तब्बल ५९ चालींनंतर रुक-पॉन एंडगेममध्ये मार्टिनेजने विजय मिळवत हरिकृष्णाला दबावात ढकलले.

## शुभमन गिलला डिस्चार्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा कसोटी कर्णधार शुभमन गिलला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात झालेल्या मानेच्या दुखापतीमुळे कोलकात्याच्या रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. ईडन गार्डन्स येथे झालेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी, गिल फलंदाजीसाठी आला आणि सायमन हार्मरच्या गोलंदाजीवर त्याने चौकार मारण्यासाठी स्वीप शॉट मारला, परंतु लगेचच त्याच्या मानेला दुखापत झाल्याने वेदना जाणवू लागल्या. फिजिओने त्याला मैदानाबाहेर नेले आणि दुसऱ्या डावात तो फलंदाजीला परतला नाही.

## ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी पुन्हा विश्वास गायकर

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

वाकण नागोठणे विभागातील बहुचर्चित ग्रामीण क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी विश्वास मोतीराम गायकर यांची दुसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



विश्वास गायकर हे गेली १५ वर्ष आई एकवीरा मंडळ पाटणसईचे अध्यक्ष सुद्धा आहेत. तसेच नागोठणे प्रवाशी संघटनेचे उपाध्यक्ष सुद्धा आहेत. गेल्या वर्षी विश्वास गायकर यांच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण सामने तसेच ग्रामीण प्रीमियर लीग भव्य स्वरूपात पार पडली.

त्या अनुषंगाने विश्वास गायकर यांची सलग दुसऱ्या वर्षी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

ग्रामीण क्रिकेट असोसिएशन मध्ये विभागातील १८ संघ खेळतात. श्री गावदेवी मंदिर पाटणसई येथे १८ संघांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या मीटिंगमध्ये अध्यक्ष विश्वास गायकर, उपाध्यक्ष विकास ठाकूर, सचिव राकेश शेलार, खजिनदार दिनेश भिसे, सहसचिव राजेश दळवी, सहखजिनदार पवन म्हात्रे, सदस्य आकेश हरपाल, गणेश राणे, राहुल उंबरे, राजा नायकोडे, योगेश कासार, महेश कीर्दत सिद्धेश तेलंगे, प्रथमेश कदम यांची निवड करण्यात आली आहे.

## संगकारानं घेतली द्रविडची जागा!

**नवी दिल्ली** : श्रीलंकेचा माजी कर्णधार आणि यष्टीरक्षक-फलंदाज कुमार संगकारा याच्याकडे राजस्थान रॉयल्सनं आणखी एक मोठी जबाबदारी सोपवली आहे. आयपीएल २०२६ च्या हंगामासाठी राजस्थान रॉयल्सच्या संघाने त्याची मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड केली आहे.

आयपीएल २०२५ च्या हंगामाआधी फ्रेंचायझी संघाने संगकाराला डायरेक्टर ऑफ क्रिकेट या पदावर नेमण्यात आलं होते. आता त्याने राहुल द्रविडची जागा घेतली आहे. दुसऱ्यांदा प्रशिक्षक पदाची जबाबदाही सांभाळताना तो संघाला विजेतेपद मिळवून देण्यासाठी प्रयत्नीशील असेल.

## महात्मा गांधी स्पोर्टस, संघर्ष महिलांच्या उपांत्य फेरीत

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महात्मा गांधी स्पोर्टस्, संघर्ष मंडळ यांनी मुंबई उपनगर पश्चिम विभाग महिलांच्या उपांत्या फेरीत प्रवेश केला. एन. पी. स्पोर्टस्, जॉली स्पोर्टस्, शिवनेरी मंडळ यांनी पश्चिम विभाग द्वितीय श्रेणी पुरुषांची चौथी फेरी गाठली.

गजानन मंडळ व पार्ले महोत्सव स्पोर्टस् अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार पराग आळवणी, आयोजक मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार्ले येथील प्ले-ग्राउंड वर हे सामने सुरु आहेत. महिलांच्या उपांत्यपूर्व फेरीत महात्मा गांधी स्पोर्टस्ने माऊली प्रतिष्ठानला ३०-०५ असे सहज नमवित उपांत्या फेरी गाठली. करीना कामतेकर, तृप्ती सोनावणे यांच्या उत्कृष्ट खेळीला याचे श्रेय जाते. दुसऱ्या सामन्यात संघर्ष मंडळाने प्रणाली नागदेवते, पायला गोळे यांच्या चतुरस्त्र खेळाने जगदंब मंडळाचा ३०-१६ असा पाडाव केला. जगदंबची सानिका पाटील चमकली.

याच विभागात द्वितीय श्रेणी गटाच्या सामन्यात एन. पी. स्पोर्टस् ने गावादेवी मंडळावर २९-२१ अशी मात केली. सुजल परब, सुधांशु एन. पी. स्पोर्टस् कडून, तर प्रसन्न बिराडी गावादेवी कडून उत्तम खेळले. जॉली स्पोर्टस् ने साई मंडळावर १७-१० असा विजय मिळविला. गौरव इंगळे जॉली कडून, तर प्रथमेश कुंभार गावादेवी कडून उत्तम खेळले.

## पॅरा कमांडो समाधान थोरातचे उल्लेखनीय यश

**। पंढरपूर । प्रतिनिधी ।**





पंढरपूर सायकलर्स क्लबचे सदस्य आणि देशसेवेत कार्यरत असलेले सोनके (ता. पंढरपूर) गावचे सुपुत्र पॅरा कमांडो समाधान थोरात याने यंदाच्या गोवा हाफ आयर्नमॅन ७०. ३ या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवत पंढरपूर तालुक्याचा मान उंचावला आहे.

गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या या स्पर्धेत पहिल्यांदाच सहभागी होत त्यांनी ही कठीण त्रिस्पर्धा केवळ ५ तास २८ मिनिटांत पूर्ण केल्याने श्री. थोरात हे वर्ल्ड हाफ आयर्नमॅन चॅम्पियनशिपसाठी पात्र ठरले आहेत.. या स्पर्धेत स्पर्धकांना १.९ किमी. पोहणे, ९० किमी सायकलिंग आणि २१.२ किमी धावणे असा एकूण टप्पा ८ तास ३० मिनिटांत पूर्ण करावा लागतो. त्यातही ५ तास ३० मिनिटांच्या आत स्पर्धा पूर्ण केल्यास वर्ल्ड हाफ आयर्नमॅन चॅम्पियनशिपसाठी पात्रता मिळते.

समाधान थोरात यांनी ही स्पर्धा केवळ ५ तास २८ मिनिटांत पूर्ण केल्याने त्यांची फ्रान्स येथे होणाऱ्या वर्ल्ड हाफ आयर्नमॅन चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे. पहिल्याच प्रयत्नात दमदार कामगिरी करत त्यांनी आपल्या जिद्दीचे व मेहनतीचे सर्वोत्तम उदाहरण साकारले आहे.

यापूर्वी त्यांनी सायकलिंगमधील नामांकित डेक्कन क्लिप हँगर-पुणे टू गोवा (६४९ किमी) ही स्पर्धाही केवळ ३५ तासांत पूर्ण करत उल्लेखनीय कामगिरी केली होती. दोन भिन्न आणि अत्यंत आव्हानात्मक स्पर्धांमध्ये मिळवलेल्या या दुहेरी यशाबद्दल समाधान थोरात यांचे विविध स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

खो-खो खेळाडूंसाठी खुशखबर! क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांची घोषणा

# नाशिकमध्ये उभारणार इनडोअर क्रीडासंकुल

**। नाशिक । वृत्तसंस्था ।**




खेळाडूंमध्ये क्षमता असून, त्यांना प्रोत्साहन, पाठबळ देण्यासाठी राज्य शासन नेहमीच सज्ज आहे. त्यादृष्टीने पायाभूत सुविधांचा विकास साधला जात आहे. महाराष्ट्रातील पहिले खो-खो बंदिस्त क्रीडा संकुल (इनडोअर स्टेडियम) नाशिकमध्ये उभारले जाईल, अशी घोषणा क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी शनिवारी (ता. १५) केली.

पंचवटीतील मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडासंकुल येथे आयोजित १९ वर्षांखालील शालेय राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. शिवछत्रपती पुरस्कार विजेते आनंद खरे, जिल्हा खो-खो असोसिएशनचे मंदार देशमुख, ऑलिंपिकपटू दत्तू भोकनळ, आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू आकाश शिंदे, आंतरराष्ट्रीय धावपटू संजीवनी जाधव, भूमिका नेहते, क्रीडा उपसंचालक स्नेहल साळुंखे, विशेष कार्यकारी अधिकारी रवींद्र नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, सर्वेश देशमुख आदी उपस्थित होते.

मंत्री ॲड. कोकाटे यांनी नाशिक जिल्हा खो-खो असोसिएशन आणि (स्व.) सुरेखाताई भोसले निवासी खो-खो प्रबोधिनीचे कौतुक केले. शासन त्यांच्या पाठीशी भरभक्कम उभे राहील, याची ग्वाही देत खेळाडूंना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

**स्पर्धेत २७५ खेळाडूंचा सहभाग**

राज्यातील आठ विभागांतील २७५ खेळाडू आणि २५ अधिकारी या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी शनिवारी आठ सामने खेळविण्यात आले. नाशिक विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वाय. डी. बिटको कन्या शाळेच्या संघाने आपल्या पहिल्या सामन्यात छत्रपती संभाजीनगरचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जालना संघाचा डावाच्या फरकाने पराभव करून विजयी सलामी दिली.

## पश्चिम विभाग महिला संघाला विजेतेपद

**। कोल्हापूर । वृत्तसंस्था ।**

बीसीसीआयतर्फे नागालॅंड येथे झालेल्या वरिष्ठ आंतरविभागीय महिला टी-२० ट्रॉफी स्पर्धेत पश्चिम विभाग महिला संघाने उत्तर विभाग महिला संघाला २५ धावांनी मात करुन अजिंक्यपद पटकाविले.

कोल्हापूरची अनुजा पाटील हिच्या नेतृत्वाखाली संघाने विजेतेपद पटकाविले. पश्चिम विभाग महिला संघाने पाच पैकी चार सामन्यांत विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. अंतिम सामन्यात पश्चिम विभागाने उत्तर विभाग महिला संघाविरुद्ध प्रथम फलदांजी करताना २० षटकांत ४ बाद १६९ धावा केल्या. त्यात हुमारिया काझी ५८, तेजल हसबनीस ४३, किरण नवगिरे ३४ आणि कर्णधार अनुजा पाटीलने २२ धावा केल्या.उत्तरादाखल खेळताना उत्तर विभाग महिला संघाने २० षटकांत ४ बाद १४४ धावा केल्या. पश्चिम संघाकडून अनुजा पाटील, सीमा ठाकूर यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. पश्चिम संघाने २५ धावांनी विजय मिळविला.स्पर्धेत अनुजाने अष्टपैलू कामगिरी केली. अंतिम फेरीपूर्वी झालेल्या सामन्यात तिने ११८ धावा आणि ११ बळी घेतले. या हंगामात डब्लूएमपीएल, वरिष्ठ महिला टी-२० आणि वरिष्ठ महिला आंतर विभागीय टी-२० या तिन्ही स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले.

### कोल्हापूरची अनुजा पाटील संघाची कर्णधार



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)